# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १० ऑगस्ट, २०२० / १९ श्रावण, १९४२ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**७२** . सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) सत्र शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी संस्थगित झाले. उपरोक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविल्यानुसार लक्षवेधी सुचनांसंदर्भातील जोडपत्रामधील प्रलंबित **१००** लक्षवेधी सूचनांपैकी **३२** लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार दिनांक ६ जुलै, २०२० रोजी पत्रक-भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता **६८** प्रलंबित सूचनांच्या निवेदनापैकी **२५** सूचनांची निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत. प्रलंबित **४३** निवेदनांबाबत संबंधित मंत्रालयीन विभागांकडे पाठपुरावा करण्यात येत असून सदर निवेदने प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या प्रती वितरीत करण्यात येतील.

**विधान भवन**,
**मुंबई,**
दिनांक : १० ऑगस्ट, २०२०

**राजेन्द्र भागवत**
सचिव (कार्यभार)
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

लक्षवेधी सूचना क्रमांक-

महाराष्ट्र विधानसभा

महाराष्ट्र विधानमंडळाचे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन-२०२०

मा. रवि राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे-

"अमरावती महसूल विभागातील (ब्रिटिशकालीन वर्हाड/बेरार प्रातांतील) कोळी महादेव आदिवासी जमातीसंदर्भात संशोधन उपलब्ध नाही व कोळी महादेव जमातीच्या नोंदी हया कोळी असू शकतात असे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडुन लेखी स्वरुपात माहितीच्या अधिकारात प्राप्त झाले असणे. घटनादत्त अधिकार प्राप्त होऊन सुध्दा अनेक विद्यार्थ्यांचे व कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे दावे अवैध ठरवून अमरावती अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती तसेच आदिवासी विभाग अनेक वर्षापासून कोळी महादेव आदिवासी जमातीवर सतत हेतुपुरस्पर अन्याय करीत असणे. अमरावती विभागातील अकोला,अमराती,बुलढाणा,यवतमाळ, वाशिम, जिल्हयातील म्हणजेच (ब्रिटीशकालीन बेरार प्रांतातील) कोळी महादेव आदिवासी जमातीसंदर्भात बेरार कोळी महादेव आदिवासी सेवा संस्था, अकोला तसेच आदिवासी कोळी महादेव जमात विकास संघ, अकोला या संस्थेने व इतर अनेक सामाजिक संस्थानी सखोल संशोधन करुन १) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे २) आदिवासी विभाग महाराष्ट्र ३ ) अनुसूचित जमाती आयोग, मुंबई ४) मा. महामहिम राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांचेकडे व तसेच राज्याचे मा. मुख्य सचिव, मंत्रालय यांना दिनांक ०७.०१.२०२० रोजी प्रत्यक्ष भेटुन अमरावती विभागातील कोळी हे आदिवासी कोळी महादेव (अनुसूचित जमात) असल्याचे अनेक निजामकालीन, ब्रिटीशकालीन ऐतिहासिक दस्तावेज निवेदनासोबत सादर करुन न्यायोचित शासन निर्णय घेण्यासाठी मागणी केली असणे. सदर निवेदने देऊन ०२ वर्षाचा कालावधी पूर्ण होऊन सुध्दा व तसेच शासनाचे मा. मुख्य सचिवांनी ०२ माहिने होऊनही मागणी शासनाच्या संबंधित विभागाकडुन आजतागायत कोणत्याही प्रकारचा ठोस निर्णय निर्गमित करण्यात आलेल्या नसणे ही बाब गंभीर स्वरुपाची असणे सदर जमातीसंदर्भात बेरार कोळी महादेव आदिवासी सेवा संस्था, कावसा ता. जि.अकोला यांनी ०२ वर्षापूर्वी दिलेल्या निवेदनावर जात प्रमाणपत्र पडताळणी समिती अमरावती यांचेकडुन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी अभिप्राय मागविले असणे. बेरार कोळी महादेव आदिवासी सेवा संस्था कावसा ता.जि.अकोला या संस्थेने अमरावती विभागातील कोळी हे कोळी महादेव असल्याचे १९५० पूर्वीचे अनेक ऐतिहासिक ब्रिटीश कालीन, निजामकालीन पुरावे सादर करुन सुध्दा अधिकृत पुराव्यावर कोणत्याही प्रकारचे भाष्य न करता विविध प्रकराच्या न्यायालयीन याचिकांचे संदर्भ देऊन एखादया उमेदवाराचा जातीचा दावा तपासताना ज्या प्रमाणे दावा अवैध ठरविला जातो त्याचप्रमाणे हेतुपुरस्परपणे जाणुनबुजुन खोटा व चुकीचा अहवाल सदर समितीने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे सादर केला असणे. अमरावती समितीने अश्या प्रकारचे चुकीचा व खोटा अहवाल सादर करुन आपल्या वरीष्ठ कार्यालयाची व बेरार मधील

रोह/मुद्रण १६८२ [५-३-२०२०]-१

आदिवासी कोळी महादेव जमातीची दिशाभुल केल्याचे निदर्शनास येणे अमरावती समितीने खोटा व दिशाभूल करणारा अहवाल आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था , पुणे यांना सादर केला असणे. ज्या प्रमाणे अहमदनगर, पुणे, नाशिक, रायगड, ठाणे, या जिल्हायातील कोळी महादेव जमातीच्या सन १९५० पूर्वीच्या नोंदी कोळी असतांना सुध्दा त्यांना जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व सर्व प्रकराच्या आदिवासींच्या सोयी सवलती दिल्या जात असणे (उदा. मा.मधुकर पिचड, कै. गोविंद गारे यांच्या जातीच्या नोंदी हया कोळी आहेत) त्याचप्रमाणे अमरावती विभागातील आदिवासी कोळी महादेव जमातीला सुध्दा सर्व प्रकारच्या सोईसुविधा शासनाने देणे अपेक्षित असणे. परंतू संबंधित विभाग दुजाभाव करत योग्य ती कार्यवाही करत नसल्याचे निदर्शनात येत असणे, शासनाने कोळी महादेव अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी सन १९५० च्या पूर्वीच्या पुराव्याच्या कागदपत्राची मागणी करुन नये असे पत्र राज्याच्या सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना दिले असणे. जमातीचे प्रमाणपत्र देणारे सक्षम अधिकारी उपविभागीय अधिकारी हे जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त कार्यरत आहेत म्हणुन शासनाने दिलेले वरीलप्रमाणे पत्र हे उपविभागिय अधिकारी यांना लागू पडत असणे. या जमातीपैकी उमेश महादेवराव ढोणे यांनी कोळी महादेव जमातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी सर्व दुर्मिळ पुराव्यासह विनंती अर्ज मा. विभागीय महसूल आयुक्त अमरावती यांचेकडे त्यांच्यास्तरावरुन उपविभागीय अधिकारी दर्यापूर यांना आदेशीत करण्यासाठी केला असणे. तसेच या संबंधाने लोकप्रतिनिधी म्हणुन लोकसभा सदस्य व विधानसभा सदस्य यांनी अमरावती विभागातील जमातीचे प्रमाणपत्र देण्यासंबधी ज्यांनी अर्ज केले आहे त्याविषयी मा. आयुक्त यांच्या सोबत बैठक करुन निवेदन दिले असणे. विशेषत: शासनाचे आदिवासी विकास विभाग पत्रक क्रमांक.२१२०/सं.क्र.१३८/का.१०,दिनांक २३.०१.२०२० या पत्रान्वये अमरावती महसूल विभागातील (ब्रिटीशकालीन वर्हाड/बेरार प्रांतातील) कोळी महादेव आदिवासी जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी व आदिवासी विकास विभाग व यांच्या अधिनस्त असलेल्या समित्या अन्याय करीत असून यासंबधाने आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांनी शासनाला अहवाल देण्यासंबधी मुदतवाढ मागितली होती व ती शासनाने मान्य करुन दिनांक १०.०१.२०२० रोजी जानेवारी २०२० अखेर सदरचा अहवाल शासनास पाठविण्याचे आदेशित केले होते या सर्व बाबी विचारात घेता जाणिपूर्वक अनेक दुर्मिळ संदर्भ देऊन वरील संस्था अडथळे निर्माण करीत असणे. वरील प्रकरणी अमरावती महसूल विभागातील (ब्रिटीशकालीन वर्हाड/बेरार प्रांतातील) कोळी महादेव आदिवासी जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्याची आवश्यकता व त्यासंबंधाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रीया."

****

मा. मंत्री आदिवासी विकास यांचे निवेदन

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ मा. राष्ट्रपती महोदयांनी अनुसूचित जमातीची प्रथम यादी दिनांक ६ सप्टेंबर, १९५० रोजी प्रसिध्द केलेली आहे. सदर यादीमध्ये केंद्र शासनामार्फत वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेली आहे. "अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश

पृच्छ १६८२-१३म

(सुधारणा) कायदा, १९७६ नुसार महाराष्ट्र राज्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीत अ.क्र. २९ वर कोळी महादेव, डोंगर कोळी अशी नोंद्द आहे.

शासनाने, "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा.क्र.२३)," लागू केला असून त्याअंतर्गत "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३," तयार केलेले आहेत. अनुसूचित जमातीचे दाखले देण्याचे व त्याच्या पडताळणीचे काम हे मा.सर्वोच्च न्यायालयाने कु.माधुरी पाटील प्रकरणी दिलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच उक्त नमूद अधिनियम २००० व नियम २००३ याप्रमाणे चालते.

अनुसूचित जमातीची प्रथम यादी ही सप्टेंबर, १९५० रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असल्याने १९५० पूर्वीच्या पुराव्यांना अनन्यसाधारण महत्व आहे. नियम २००३ मधील नियम ३(३) मध्ये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर करावयाची यादी देण्यात आलेली आहे. यामध्ये १९५० पूर्वीच्या पुराव्याचा उल्लेख आहे. तथापि नियम २००३ मधील नियम ३ (४) नुसार अर्जदार कोणताही एक किंवा अनेक दस्तऐवज सादर करण्यास असमर्थ असेल तर अशा प्रकरणी अर्जदार त्याबाबतची कारणे आपल्या शपथपत्रात नमूद करील आणि सक्षम प्राधिकाऱ्यास त्यावर विचार करता येईल व त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, गुणांवगुणावरुन दाव्याचा निर्णय देईल अशी तरतूद आहे. तसेच उक्त अधिनियम २००० च्या कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदारावर आहे.

महाराष्ट्राच्या अनुसूचित जमातीच्या यादीतील नमूद अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करणाऱ्या प्रत्येक अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र प्राप्त होते. विशिष्ट क्षेत्रातील अनुसूचित जमातीसाठी वेगळे नियम अस्तित्वात नाहीत.

अमरावती महसुल विभागातील (ब्रिटीशकालीन बेरार प्रांतातील) आदिवासींच्या नोंदीमध्ये कोळी महादेव अशा नोंदी १९५०, १९६० च्या अनुसूचित जमातीच्या याद्यांमध्ये झालेल्या नसल्याने बेरार प्रातांतील कोळी महादेव बाबतचे संशोधन उपलब्ध नाही.

कोळी महादेव जमातीच्या लोकांच्या नोंदी कोळी असू शकतात, मात्र त्याआधारे बिगर आदिवासी कोळी जातीच्या लोकांमार्फत नामसदृष्याचा गैरफायदा घेण्यात येतो. अहमदनगर, पुणे, नाशिक, रायगड, ठाणे/पालघर जिल्ह्यांमधील कोळी महादेव जमातीच्या सन १९५० पूर्वीच्या नोंदी कोळी असतानाही त्यांना अनुसूचित जमातीची प्रमाणपत्रे व जमात वैधता प्रमाणपत्रे देताना उपलब्ध कागदोपत्री पुराव्यांव्यतिरिक्त सामाजिक सांस्कृतीक आप्तभाव आणि रक्तनातेसंबंध तपासण्यात येतात. त्यामूळे कोणत्याही प्रकारचा दुजाभाव तपासणी समित्यांमार्फत करण्यात येत नाही.

बेरार कोळी महादेव आदिवासी सेवा संस्था, कवसा यांनी ऑगस्ट, २०१७ मध्ये विदर्भातील बेरार प्रांतातील सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या आदिवासी कोळी महादेव जमातीबाबत निजामकालीन, ब्रिटीशकालीन संदर्भ सादर करुन सदर जुने दस्तऐवज, गॅझेट हे संदर्भ ग्रंथ म्हणून

ग्राह्या धरावेत असे निवेदन शासनास तसेच अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांना सादर केले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी त्यांचा अहवाल अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई व शासनास सादर केले होते. तथापी सदर अभिप्राय हे त्रोटक स्वरुपाचे असल्याने बेरार कोळी महादेव आदिवासी सेवा संस्था, कवसा यांनी सादर केलेल्या दस्तऐवजांच्या अनुषंगाने सविस्तर अभिप्राय देण्याबाबत आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना सूचना देण्यात आल्या होत्या. यासंदर्भात बेरार कोळी महादेव आदिवासी सेवा संघाने सादर केलेले पुरावे तपासून त्याबाबत अभिप्राय देण्यासाठी जानेवारी, २०२० अखेरपर्यंत मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार दिनांक ८ जानेवारी, २०२० च्या पत्रान्वये यांसदर्भात अहवाल सादर करण्यास आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस मुदतवाढ देण्यात आली.

दरम्यानच्या काळात बेरार कोळी महादेव आदिवासी सेवा संस्थेच्या प्रतिनिधींनी दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी पुन्हा मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन तसेच आदिवासी विकास विभागास निवेदन सादर केले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने संस्थेचे प्रतिनिधी तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी यांची दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजी संयुक्त बैठक झाली. सदर संस्थेने सुरुवातीच्या काळात ४७ संदंर्भ सादर केले होते. तसेच दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजीच्या बैठकीनंतर ३३ संदर्भ सादर केले. अशा प्रकारे संस्थेने एकूण ८० संदर्भ सादर केलेले असून या सर्व संदर्भाचे विश्लेषण करण्यास वेळ लागणार असल्याने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने अहवाल सादर करण्यास मार्च, २०२० अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या विषयासंदर्भात आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

****

७

लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**सर्वश्री. विक्रमसिंह सावंत, अमीन पटेल, पृथ्वीराज चव्हाण, हिरामण खोसकर, लहू कानडे, सुरेश वरपुडकर, श्रीमती. सुलभा खोडके, सर्वश्री. विकास ठाकरे, सुभाष धोटे, कुणाल पाटील, ऋतुराज पाटील, धिरज देशमुख, मोहनराव हंबर्डे, राजेश एकडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री.राजु पारवे, वि.स.स.,यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-**

" रत्नागिरी जिल्हयातील गुहागर-विजापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम संथगतीने सुरु असणे, त्यामुळे दळणवळण व दैनंदिन व्यवहारांवर होणारा परिणाम, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रस्ते व इमारती प्रकल्पाकरीता दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजी अंमलबजावणीचे आदेश असूनही त्याचे पालन न होणे, ठेकेदारांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामाचा ठेका मिळण्यापूर्वी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणा-या शेतक-यांकडून लेखी परवानगी घेणे आवश्यक असूनही ती घेण्यात न येणे, तसेच त्यांना नुकसान भरपाई अद्याप न देणे, अशा कंत्राटदार कंपनीवर प्रशासनाचे दुर्लक्ष होत असणे, परिणामी रस्ता मोठया प्रमाणात उखडला असल्याने रस्त्यावर छोटे-मोठे जीवघेणी खड्डे पडले असल्याने वाहनधारकांचे छोटे मोठे होत असलेले अपघात, यात अनेकाचा नाहक होत असलेला मृत्यू, तसेच अनेकांना कायमचे अपंगत्व येणे, तर अनेकजण गंभीर जखमी होणे, कोटयावधीच्या निधीला मंजूरी देऊनही कंत्राटदार कामाबाबत बेजबाबदारपणे वागणे, मात्र याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष , त्यामुळे परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, सबब, कंत्राटदारी कंपनीवर व त्यांना सामील असणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. "

### मा.मंत्री, सा.बां.(सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

गुहागर- चिपळुण - कराड- विजापूर रस्ता दि.०३.०१.२०१७ च्या केंद्रीय अधिसूचनेनुसार राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ ई (पूर्वीचा रा.म.क्र.७८) म्हणून घोषित झाल्यानंतर केंद्र शासनाकडून सदर रस्ता दुपदरीकरणासह दर्जोन्नत करण्याचे निश्चित करणेत आले. सदर रस्त्याची कि.मी.००/०० ते ७४/६०० अशी एकूण ७४.६० कि.मी. लांबी रत्नागिरी जिल्हयातून जाते. सदयस्थितीत एकूण लांबीपैकी कि.मी.०/०० ते २६/८०० (गुहागर ते रामपूर) व कि.मी. ४५/६०० ते ५३/६०० (चिपळूण उत्ताड ते पिंपळी बुद्रुक) ही ३४.८० कि.मी. लांबी राष्ट्रीय महामार्ग मंडळाअंतर्गत राष्ट्रीय महामार्ग विभाग,रत्नागिरी कार्यालयाकडे दुपदरीकरणाकरीता वर्ग असून कि.मी. ४०/६१० ते ४५/६०० (उक्ताड ते बहादूरशेखनाका) ही लांबी दि. २९.०५.२०१९ रोजी चिपळुण नगर परिषदेकडे हस्तांतरण झाली असून या लांबीची देखभाल दुरुस्ती त्यांचेमार्फत सुरु आहे .उर्वरीत ३४.८१ कि.मी. लांबी सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांचेकडे देखभाल दुरुस्तीसाठी ताब्यात आहे.

**कि.मी.०/०० ते २६/८०० (गुहागर ते रामपूर) व कि.मी. ४५/६०० ते ५३/६०० (चिपळूण उत्ताड ते पिंपळी बुद्रुक) :- एकूण ३४.८० कि.मी.**

राष्ट्रीय महामार्ग,रत्नागिरी विभागाकडील सदर लांबीमध्ये अस्तित्वातील रस्त्याच्या १०.०० मी. रुंदीमध्ये काँक्रीटीकरण, पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरण करण्याचे काम सन २०१६-१७ च्या वार्षिक आराखडयामध्ये समाविष्ट करण्यात आले होते. त्यानुसार कामाकरिता दि.१३.०६.२०१७ रोजी कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश देण्यात आले असून एकूण ३४.८०कि.मी.पैकी ७.३५ कि.मी.लांबीतील काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे व उर्वरीत काम प्रगतीत आहे.

कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश देताना निविदेमधील तरतुदीनुसार ९० टक्के पेक्षा जास्त जमीन विभागाच्या ताब्यात असणे आवश्यक असल्यामुळे प्रकल्पासाठी लागणा-या एकूण ९४.२३ हेक्टर आवश्यक जमिनीपैकी

८५.७६ हेक्टर जमीन खात्याच्या ताब्यात असल्याने कामास कार्यारंभ आदेश दि. १३.०७.२०१७ रोजी देण्यांत आले. उर्वरीत ७.५३७ हेक्टर जमीन संपादनाकरीता भूसंपादन प्रक्रियाही सुरु करण्यात येऊन सदयस्थितीत भूसंपादन प्रक्रिया कामी रु.५४.९० कोटी मंजूर तरतुदीपैकी रु. ४३.९२ कोटी इतका निधी विशेष भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, चिपळूण यांचेकडे तात्काळ वर्ग करण्यांत आला आहे. सदर निधीतून भूसंपादन प्रक्रियेमध्ये निवाडे जाहिर झाल्यानंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूस बाधित होणा-या शेतक-यांना नुकसान भरपाई अदा केली जाईल व त्यानंतरच संपादन केलेल्या खाजगी जागेत काम करण्यात येणार आहे. सदयस्थितीत रस्त्याच्या उपलब्ध रुंदीतच काम सुरु आहे.

कार्यारंभ आदेशानंतर संपूर्ण लांबीमध्ये कंत्राटदाराकडून रस्त्याची नियमित देखभाल दुरुस्ती निरंतरपणे सुरु ठेवण्यात आली आहे. दुरुस्तीअभावी रस्त्यावरील खड्डयांमुळे अपघात होणे, नाहक मृत्यु, कायमचे अपंगत्व अथवा गंभीर जखमी होणे अशा स्वरुपाची कोणतीही सूचना/नोंद क्षेत्रीय कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही. तसेच पोलीस खात्याकडून रस्त्यामुळे अशा स्वरुपाच्या बाबी घडल्याची सूचनाही प्राप्त नाही.

भूसंपादन प्रक्रियेत व कामामध्ये स्थानिकांकडून वारंवार अडथळे आणले गेल्यामुळे कामाची गती कंत्राटदारास निविदेनुसार राखता आली नाही. कामातील अडथळे दूर करण्यासाठी वाहतूक,भूमी अभिलेख व संबंधित नागरिक यांचेशी विभागीय कार्यालयामार्फत सातत्याने समन्वय साधण्यात येवून संयुक्त मोजणीचे काम सत्वर पूर्ण होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत.त्यानुसार सदयस्थितीत राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अखत्यारित असलेल्या संपूर्ण लांबीमध्ये संयुक्त मोजणीचे काम जवळजवळ पूर्ण होत आले आहे व भूसंपादनाची पुढील प्रक्रिया प्रगतीत आहे.

**कि.मी. २६/८०० ते ४०/६१० (रामपूर ते उक्ताड) व कि.मी. ५३/६०० ते ७४/६०० (पिंपळी बु. ते कुंभार्ली घाट जिल्हा हद्द) :- एकूण लांबी ३४.८१ कि.मी.**

सदर लांबी राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित झाल्याने या लांबीमध्ये खड्डे भरण्यापलिकडे कोणतीही सुधारणा व नुतणीकरणाचे काम मंजूर होवू शकले नाही.

तथापि जून २०१७ ते ऑक्टोंबर २०१८ या कालावधीतील २ पावसाळी हंगामात कोकणात झालेल्या अनिवृष्टिमुळे व अवजड वाहनुकीमुळे कि.मी. ५३/६०० ते कि.मी. ७४/६०० (पिंपळी ते कुंभार्ली घाट जिल्हा हद्द) ही लांबी अतिशय खराब होवून खड्डे भरण्याएलीकडे गेल्याने स्थानिक जनता व लोकप्रतिनिधींनी या संपूर्ण लांबीमध्ये मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी उपोषण/रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे कळविले. त्या अनुषंगाने रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रम (SR Phase I) अंतर्गत एकूण रक्कम रु. १०७०.०० लक्ष किंमतीची ४ कामे व कि.मी. २६/८०० ते ४०/६१० (रामपूर ते उक्ताड) या लांबीमध्ये एकूण रु. ४७५.०० लक्षच्या २ कामांना मंजुरी देण्यात आली. त्यानुसार या कामांची निवीदा प्रक्रीया अंतिम टप्प्यात आणून ठेवणेत आली. मात्र याच लांबीमध्ये राष्ट्रीय महामार्ग विभागाने सुद्धा निवीदा प्रक्रीया राबविलेचे समजलेने शासकीय निधीची द्विरुक्ती होवू नये, याकरीता SR Phase I मध्ये मंजूर असलेली कामे सा.बां. विभागामार्फत कार्यान्वित करावी अगर कसे याबाबत राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून मागविण्यात आलेले स्वंयस्पष्ट अभिप्राय त्यांचेकडून दि. १७/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त होऊन सहमती दर्शविली. मात्र, या दरम्यान शासन पत्र क्रं. बीजीएम-२०१९/(८०/२०१९)/ अर्थ-१, दिनांक १४.११.२०१९ अन्वये सर्व कामांची कार्यारंभ आदेश देणेची कार्यवाही दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत संस्थगित करण्याच्या शासनाच्या आदेशामुळे या कामांचे कार्यारंभ आदेश देणे शक्य झाले नाही.

मात्र, रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झालेमुळे या कामांचे कार्यारंभ आदेश देणेकरीता विशेष बाब म्हणून परवानगी मिळवून खराब लांबीतील कामे सदयस्थितीत सा.बां. विभागामार्फत सुरु असून ही कामे मार्च २०२० अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

******************

लक्षेवधी सूचना क्र. 92

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन

**ॲड. अशोक पवार, सर्वश्री सुनिल टिंगरे, दिलीप मोहिते-पाटील, सुनिल शेळके, चेतन तुपे, निलेश लंके विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.**

"चासकमान प्रकल्पाच्या (ता. राजगुरुनगर, जि. पुणे) डाव्या कालव्याचा लाभ शिरुर व खेड तालुक्यातील शेतकऱ्यांना होणे, चासकमान प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची लांबी १४४ कि.मी. असणे, एकूण लांबीपैकी फक्त १५ कि.मी. लांबीचे अस्तरीकरणाचे काम पूर्ण झालेले असणे, डाव्या कालव्याला अनेक ठिकाणी गळतीचे मोठे प्रमाण असल्याने राजगुरुनगर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी नापिक होण्याच्या मार्गावर असणे, डाव्या कालव्याच्या शिरुर तालुक्यातील डी. वाय. १२ ते डी. वाय. २४ दरम्यान अनेक ठिकाणी कालवा विमोचक व त्याच्या पोटचाऱ्यांची कामे अपूर्ण असल्याने शेतकरी पाण्यापासून वंचित राहणे, गेली १० वर्षापासून सदर प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता नसणे, अपूर्ण कामे पूर्ण झाल्यास शिरुर तालुक्यातील सुमारे २७ गावांमधील १० हजार हेक्टर क्षेत्र नव्याने ओलिताखाली येणार असल्याने, प्रकल्पांच्या नवीन कामांना मंजूरी मिळत नसणे, धरणामध्ये पाणी उपलब्ध असूनही लहान-मोठी कामे निधी अभावी राहिल्यामुळे त्याचा लाभ शेतकऱ्यांना न मिळणे, कालव्याचे अस्तरीकरणाचे कामही बऱ्याच मोठया प्रमाणात अपूर्ण असल्याने पाणी गळती होऊन शेवटच्या टोकापर्यंत कमी दाबाने पाणी जाणे, शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदलाही अद्याप मिळालेला नसणे, तसेच डिंबा कालव्याच्या अपूर्ण कामांमुळे शिरुर तालुक्यातील निमगांव भोगी गावाच्या पुढे गोलेगांव या गावापर्यंत कालव्याचे पाणी न पोहचणे, यामुळे शेतकऱ्यांची डिंबा कालव्याची अपूर्ण कामे पूर्ण होणेसाठी वारंवार मागणी होणे तसेच चासकमान प्रकल्पाच्या अपूर्ण कामासाठी खास बाब म्हणून निधी उपलब्ध होणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**श्री. जयंत पाटील, मंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन**

पुणे जिल्हयातील चासकमान धरणाचा पाणीसाठा २४१.६९ दलघमी (८.५३ टीएमसी ) इतका असून प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या कालव्याची लांबी अनुक्रमे १४४ कि.मी. व १८ कि.मी. इतकी आहे.त्याद्वारे खेड व शिरूर तालुक्यातील ४४१७० हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली येणार असून सद्यःस्थितीत ३८८४६ हे. इतकी सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. चासकमान डाव्या कालव्याची कामे ३० ते ३५ वर्षापुर्वी रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आलेली असून गाभा कवच भरावामध्ये विर्निदिष्टाप्रमाणे काम न झाल्याने जुन्या लादीमोरीतून पाण्याचे गळतीचे प्रमाण लक्षणीय आहे.

सदर प्रकल्पाची मंजूर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. ३८८.१३ कोटी इतकी आहे. प्रकल्पाचा प्रस्तावित व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळण्यास काही कालावधी लागणार असल्याने चासकमान डावा कालवा कि.मी. १ ते ७२ मध्ये निवडक ठिकाणी कालवा भरावामधील गळती दुरुस्ती, बांधकाम दुरुस्ती व इतर अनुषंगीक

शेरा H/1558 (700-3-2020)

कामे करणे तसेच कि.मी. ७३ ते १४४ निवडक ठिकाणी अस्तरीकरण हे मूळ काम व उर्वरीत कालवा भरावामधील गळती दुरुस्ती, बांधकाम दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामे बिगरसिंचन तसेच पुनर्स्थापना निधीमधून प्रस्तावित असून त्याबाबत महामंडळ स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

महाराष्ट्र कृष्णा खो-यातील कुकडी संयुक्त प्रकल्पांतर्गत डिंभे प्रकल्पाचा समावेश आहे. डिंभे धरणाची एकूण पाणी साठवण क्षमता १३.५० टी.एम.सी. असून त्यापैकी उपयुक्त पाणी साठवण क्षमता १२.५० टी.एम.सी. व अचल पाणी साठवण क्षमता १.०० टी.एम.सी. इतकी आहे.

धरणाच्या डाव्या कालव्याची एकूण लांबी ५५ कि.मी. असून उजव्या कालव्याची एकूण लांबी ११६ कि.मी. आहे. डिंभे उजवा कालवा कि. मी. १०५ ते १०९ मधील काही भागातील कालव्याचे काम व डिंभे उजव्या कालव्याचे वितरीका व लघु वितरीकांची कामे अपूर्ण असल्याने शिरुर तालुक्यातील निमगांव भोगी गावाच्या पुढे गोलेगांव या गांवापर्यंत कालव्याचे पाणी पोहचत नाही.

सद्य:स्थितीत कुकडी प्रकल्पास शासन निर्णय दिनांक ०२/११/२०१८ अन्वये रु. ३९४८.१७ कोटी इतक्या किंमतीस शासनाने तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. निधीचे उपलब्धतेनुसार भुसंपादन कायदा २०१३ नुसार भुसंपादनाची कार्यवाही करुन उर्वरीत कामे करणेची कार्यवाही करणेत येत आहे.

डिंभे उजवा कालवा कि.मी. ०/०० ते १०४/२७० मधील अस्तरीकरण वगळता सर्व कामे पुर्ण होऊन कि.मी. १०४ पर्यंत सिंचनासाठी पाणी सोडण्यात येते. सद्य:स्थितीत डिंभे उजवा कालवा कि. मी. १०५ ते १०९ मधील एकूण ८६० मी. लांबी मधील उर्वरीत कामे बाकी आहेत. सदर उर्वरीत लांबीतील कामांच्या निविदा कार्यवाही पूर्ण होवून कामाचे कार्यारंभ आदेश दिलेले आहेत. डिंभे उजवा कालवा कि.मी. १०९ ते ११६ मधील बहुतांशी कामे पुर्ण झालेली आहेत. डिंभे उजवा कालव्यावरील कि. मी. १०४ ते कि. मी. ११६ मधील शिल्लक असलेली कामे पुर्ण झाल्यानंतर डिंभे उजवा कालवा कि. मी. ११६ पर्यंत कालव्यातून पाणी सोडणे शक्य होईल.

डिंभे उजव्या कालव्यावरील वितरण व्यवस्थेच्या कामाचे नियोजन झाले असून एकूण ८३ मायनर्स व ७ वितरीका आणि ७३ थेट विमोचकांमार्फत १५५६८ हेक्टर क्षेत्र सिंचन निमिर्ती उद्दिष्ठ निश्चित करण्यात आले आहे. सदय:स्थितीत ३० मायनर्स व ७ वितरीका व ५५ थेट विमोचकांची कामे पुर्ण झालेली आहेत. उर्वरीत ५३ मायनर्स व १८ थेट विमोचकांची कामे पूर्ण करण्याबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

डिंभे उजवा कालव्याच्या लाभक्षेत्राखालील शिरुर तालुक्यातील एकूण ६९०७ हेक्टर क्षेत्रापैकी ४२३० हेक्टर सिंचन निर्मिती झालेली आहे. शिरुर तालुक्यातील उर्वरीत २६७७ हेक्टर क्षेत्रावरील सिंचन निर्मितीची कामे पूर्ण करण्याबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

डिंभे उजव्या कालव्याच्या ११६ कि. मी. लांबीपैकी कि. मी. १०२ पर्यंत अस्तरीकरण करणे प्रस्तावित आहे. त्यापैकी ५३ % काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत कामाच्या निवीदा स्विकृत करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

चासकमान प्रकल्पाची मंजूर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. ३८८.१३ कोटी इतकी आहे. प्रकल्पाचा प्रस्तावित व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळण्यास काही कालावधी लागणार असल्याने दिनांक २८/१२/२०१९

रोजी झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार महामंडळाने डावा कालवा कि.मी. १ ते १४४ मध्ये प्राधान्याने मोठया प्रमाणात गळती होत असलेल्या बांधकामाची दुरुस्ती व आवश्यकतेनुसार निवडक ठिकाणी अस्तरीकरण करणे अशा तातडीच्या गळतीप्रतीबंधक उपाययोजनाची कामे सक्षम स्तरावरील मंजूरीने बिगर सिंचन तसेच पुनर्स्थापना निधीमधून प्रस्तावित करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तथापि चासकमान प्रकल्पासाठी सन २०१९-२० मध्ये भूसंपादनासाठी रु. ६.२३ कोटी इतकी व बांधकामासाठी रु. ५.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

---

H1/558-2

लक्षेवधी सूचना क्र. ९४

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२० चे अर्थसंकल्पिय अधिवेशन

श्री. अनिल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. पुढीलप्रमाणे आहे:-

"निम्न तापी प्रकल्प हा मोठा प्रकल्प तापी नदीवर अमळनेर तालुक्यातील मौजे पाडळसे गावाजवळ निधी अभावी बांधकामाधीन अवस्थेत असणे, निम्न तापी प्रकल्पाचा टप्पा-१ नुसार पाणीसाठा २६२.५८ दलघमी एवढा असून उपयुक्त पाणीसाठा २४९.६१ दलघमी असणे, त्याअनुषंगाने निम्न तापी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात एकूण २३९७.६० हेक्टर जमिन जात असून ५ गावे पूर्णत: व ६ गांवे अंशत: बाधित होणे, तृत्तीय सुधारीत प्रकल्प अहवालानुसार टप्पा -१ नुसार जळगांव व धुळे जिल्हयातील अमळनेर, चोपडा, पारोळा, धरणगांव, शिंदखेडा व धुळे या तालुक्यातील एकूण ३२३२८ हेक्टर क्षेत्र उपसा सिंचन पध्दतीने सिंचीत करण्याचे नियोजन असणे, शासनाचे दिनांक ०९/०९/२०१९ च्या पत्रान्वये PMKSY व BJSY या दोन्ही योजनेत समाविष्ट असलेले प्रकल्प वगळून उर्वरित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रु. १५००० कोटीचे दिर्घ मुदतीचे कर्ज घेण्यास मान्यता प्राप्त झालेली असून सदर नमूद प्रकल्पांपैकी निम्न तापी प्रकल्पास रु. १५०० कोटीची तरतूद करण्यात आलेली असणे, त्याअनुषंगाने कार्यवाही होणे, उर्वरित स्थापत्य कामे, वक्राकार दरवाजे, उर्वरित भूसंपादन, पुनर्वसन कामे व उपसा सिंचन योजना कामे करणे प्रकल्प विहित वेळेत पूर्ण करण्याच्या अनुषंगाने अतिमहत्वाचे असणे, साने गुरुजी सहकारी उपसा सिंचन योजना, बोहरा, ता. अमळनेर ची दुरुस्ती विशेष बाब म्हणून प्रशासकीय मान्यता दि. २५/०६/२०१९ अन्वये प्राप्त असणे व निधी उपलब्ध होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

निम्न तापी प्रकल्प मोठा प्रकल्प तापी नदीवर अमळनेर तालुक्यातील मौजे पाडळसे गावाजवळ बांधकामाधीन अवस्थेत आहे. प्रकल्पास रु.१४२.६४ कोटी किमतीस दिनांक ६/३/१९९७ रोजी मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सद्यस्थितीत रु.११२७.७४ कोटी (दरसुची वर्ष २००८-०९) किमतीस दिनांक १४/९/२००९ रोजी तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. तसेच प्रकल्पाच्या अद्ययावत किंमत रु.२७५१.०५ कोटीस केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांच्या दिनांक ४/६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्राप्त आहे. प्रकल्पाच्या टप्पा-१ नुसार पाणीसाठा २६२.५८ दलघमी एवढा असून उपयुक्त पाणीसाठा २४९.६१ दलघमी आहे. त्याअनुषंगाने निम्न तापी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात एकूण २३९७.६० हेक्टर हेक्टर जमिन जात असून ५ गावे पूर्णत: व ६ गावे अंशत: बाधित होतात. तृतीय सुधारीत प्रकल्प अहवालानुसार टप्पा-१ नुसार जळगांव व धुळे जिल्ह्यातील अमळनेर, चोपडा, पारोळा, धरणगांव, शिंदखेडा व धुळे या तालुक्यातील एकूण ३२३२८ हेक्टर क्षेत्र उपसा सिंचन पध्दतीने सिंचीत करण्याचे नियोजन आहे.

रोटा H/1557 (702-03-2020)-1

**प्रकल्पाची सद्यस्थिती-**

सद्यस्थितीत प्रकल्पांतर्गत धरणाच्या सांडवा मुर्धा पातळी १३९.२४ मी पर्यंत बांधकाम झालेले आहे. त्याअनुषंगाने १२.९७ दलघमी मृतजलसाठा निर्माण झाला असून अप्रत्यक्षपणे १६२० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. प्रस्तंभाचे १४० मी. तलांकापर्यंत बांधकाम झाले आहे. डावी बाजूचे जलरोधी खंदकाचे काम पूर्ण झाले असून मातीकाम प्रगतीत आहे. डाव्या बाजुच्या वाढीव विभाजक भिंतीचे काम १४५.४० मी. उंची पर्यंत पुर्ण झाले आहे. तसेच उजव्या तिरावरील माती धरण, डाव्या व उजव्या मार्गदर्शक भिंतीचे काम पुर्ण झाले आहे. वक्राकार दरवाजे निर्मितीचे ४०% (वक्राकार दरवाज्यांचे सुटे भाग) काम पुर्ण झाले आहे. आजमितीस डाव्या तिरावरील मातीकाम व डाव्या तिरावरील विभाजक भिंतीचे काम प्रगतीपथावर आहे.

**पुर्नवसन व भूसंपादन-**

प्रकल्पाच्या प्रस्तावित टप्पा १ नुसार पुर्णत: ५ व अंशत: ६ असे एकुण ११ गावांचे पुनर्वसन करणे प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत पाडळसे, धुपे व विचखेडा या तीन पुर्नवसीत गावठाणातील नागरी सुविधा पुर्ण करून गावांचे हस्तांतरण झालेले आहे. तसेच मौजे सात्री गावठाणाच्या नागरी सुविधांचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित ७ गावांच्या पुर्नवसनाकरीता संबधीत ग्रामस्थांकडून / ग्रामपंचायतीकडून ठराव प्राप्त करुन घेतलेले असून गृहसंपादन प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. टप्पा-१ अंतर्गत एकूण २३९७.६० हेक्टर क्षेत्र संपादित करावयाचे असून तलांक १५२.८८ मी. (टप्पा-१) च्या सर्वेक्षणानुसार ७८ गावांची खाजगी जमीन व सरकारी जमीन मिळून एकुण क्षेत्र २१४६.४८ हेक्टर आर बुडीत क्षेत्रामध्ये येते. सदर पैकी ४७६.९९ हेक्टर आर एवढे क्षेत्र संपादीत करण्यात आलेले आहे. तसेच प्रकल्पाच्या धरण पाया, नवीन पुनर्वसन गावठाण, पोहच रस्ते व इतर प्रयोजनार्थ एकूण १५१.२१ हेक्टर आर क्षेत्राचे संपादन करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत एकूण ६३१.३२ हेक्टर आर क्षेत्र संपादीत करण्यात आलेले आहे.

**उपसा सिंचन योजना-**

प्रकल्पांतर्गत ५ शासकीय उपसा सिंचन योजनांचे सर्वेक्षणाचे काम पुर्ण झाले असून सविस्तर संकल्पनाचे काम प्रगतीपथावर आहे.

निम्न तापी प्रकल्पावर जानेवारी-२०२० अखेर रु.४८९.८८ कोटी एवढा खर्च झालेला आहे. सदर प्रकल्पावर सन २०१९-२० मध्ये रु.३२.५० कोटी एवढी तरतूद शासनाने केलेली आहे.

शासन निर्णय दिनांक ९/९/२०१९ नुसार प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना व बळीराजा जलसंजीवनी योजना या दोन्ही योजनेत समाविष्ट असलेले प्रकल्प वगळून उर्वरीत प्रकल्पांपैकी प्रगतीपथावरील असणारे व पुढील तीन वर्षात पूर्ण होणाऱ्या ५२ प्रकल्पांसाठी सन २०१९-२० ते २०२१-२२ या तीन वर्षात रु.१५००० कोटींचे दिर्घ मुदतीचे कर्ज वित्तीय संस्थांकडून घेण्यास मान्यता दिली आहे. या प्रस्तावामध्ये इतर

H1557-1a

प्रकल्पासमवेत निम्न तापी मोठा प्रकल्प या प्रकल्पांचा समावेश आहे. निधीचे उपलब्धतेनुसार व कालबध्द पध्दतीने टप्याटप्याने प्रकल्पाची कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

**सानेगुरुजी उपसा सिंचन योजना बोहरा, ता.अमळनेर-**

बोहरा ता. अमळनेर जि. जळगांव निम्न तापी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील अस्तित्वातील साने गुरुजी जल उपसा सिंचन योजना पुनर्स्थापित करुन कार्यान्वित करण्यासाठी दिनांक २५/०६/२०१९ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. तथापि, जलसंपदा विभागांतर्गत चालू अर्थसंकल्पीय वर्षात (सन २०१९-२०) ज्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे व सदर योजना अद्याप सुरु/कार्यान्वित झालेल्या नाहीत, अशा योजनांचा आढावा घेऊन त्यांना स्थगिती देण्याची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे. परंतु अद्यापपावेतो याबाबत अंतीम निर्णय झालेला नाही.

दरम्यान सन २०१९-२० या आर्थिक वर्षात निधी उपलब्धतेसाठी मार्च २०२० च्या अर्थसंकल्पीय वर्षात लाक्षणीक तरतुदीचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता त्यास मंजूरी मिळाली नाही.

---

**श्री.नरेंद्र भोंडेकर, विसस यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये विधानसभा उपस्थित केलेली लक्षवेधी पुढील प्रमाणे आहे.**

**"भंडारा विधानसभा (ता.जि.भंडारा) क्षेत्रातील भंडारा व पवनी तालुक्यातील अंशत: बाधित ३४ गावातील नागरिकांचे पुनर्वसन न करता, वाढीव कुटुंब आर्थिक मोबदल्यापासून वंचित असणे, त्यांना योग्य तो मोबदला देणे, कुटुंबांचे पुनर्वसन करुन त्यांना नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम २.९० लक्ष रुपये अंदाजे ५०० कुटंबांना देणे अत्यावश्यक असणे, गेल्या अनेक वर्षापासून शेकडो कुटुंबांना शासनाने प्रकल्पग्रस्तांना जमीनीच्या मोबदल्यात नोकरी देण्याचे आमिष देणे, नोकरी देण्यात शासन अपयशी ठरणे परंतु अद्यापही त्यांना नोकरी न मिळणे, अश्या कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरी देण्याची शासनाची तरतुद असणे परंतु नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम २.९० लक्ष देण्याचे शासन निर्णय आर.पी.ए- ०२१०/प्र.क्र.६९(भाग-२)का-र-१ दिनांक १८/०६/२०१३ नुसार व शासन निर्णय घेणे, सदर सुधारीत शासन निर्णय महसूल व वन विभाग आर.पी.ए.-२०१५ / प्र.क्र.९९ र-१ दिनांक १९/०८/२०१५ नुसार निर्णय होऊनही लाभापासून वंचित असणे, आर्थिक मदत देणे संदर्भात शासन स्तरावर निर्णय न होणे, वर्षोगिणती मोबदला मिळण्यास विलंब झाल्याने एकमुस्त रकमेमध्ये वाढीव मोबदल्याची बाधित कुटुंबांची मागणी करणे, वाढीव मोबदल्यासाठी जिल्हाधिकारी, भंडारा, उपायुक्त (पुनर्वसन) नागपूर यांचे मार्फत जा.क्र.अका/पुनर्वसन/कावि-१५७/२०१८, दिनांक २३/१०/२०१८ रोजी अपर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन महसूल विभागाच्या र-१ कार्यासन प्र.क्र.२५६/२०१८ याकडे प्रस्ताव सादर करणे, त्यावर अद्यापही कार्यवाही न होणे, प्रकरण प्रलंबित असणे अथवा शासन स्तरावर कोणताही धोरणात्मक निर्णय न होणे त्यामुळे गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त अंशत: बाधित कुटुंबांची मागणी याप्रकरणी कुटुंबामध्ये शासनाप्रती तीव्र असंतोषाची भावना निर्माण होणे शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".**

**<u>मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन</u>**

शासन निर्णय दिनांक १८.६.२०१३ अन्वये नागपूर, भंडारा व चंद्रपूर जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांकरिता विशेष आर्थिक पॅकेज देण्याबाबत निर्णय घेऊन रु. ११९९.६० कोटी एवढया किंमतीच्या विशेष आर्थिक पॅकेजला मान्यता देण्यात आली. या पॅकेजमध्ये पर्यायी शेतजमीनी ऐवजी रोख रक्कम, पुनर्वसन अनुदान, गुरांचा गोठा बांधण्यासाठी आर्थिक मदत,

नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम व वाढीव कुटुंबासाठी घरबांधणी अनुदान या बाबींचा समावेश करण्यात आला. शासन निर्णय दिनांक १९.८.२०१५ अन्वये गोसीखुर्द प्रकल्पातील वाढीव कुटुंबाना नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. एकूणच उपरोक्त दोन्ही शासन निर्णयान्वये ज्या प्रकल्पग्रस्त कुटुंबाचे पुर्णत: पुनर्वसन झाले आहे अश्या कुटुंबाना म.ग्रा.रो.ह.यो. च्या निकषानुसार रु.२.९० लक्ष इतकी एकमुस्त रक्कम देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये अंशत: बाधित प्रकल्पग्रस्तांचा समावेश करण्यात आलेला नाही.

भंडारा जिल्हयातील भंडारा व पवनी तालुक्यातील ३४ पुर्णत: बाधित गावांचे पुनर्वसन २६ पर्यायी गावठाणात करण्यात आलेल आहे. एकुण ३४ पूर्णत: बाधित गावातील ६६३६ कुटूंब संख्येपैकी ४६०९ कुटुबांचे स्थलांतरण २१ पर्यायी गावठाणामध्ये करण्यात आलेले आहे. २०२७ कुटुंबे गोसीखुर्द धरणाचे पुर्ण संच पातळीवरील आहे.

शासन निर्णय दिनांक १८/०६/२०१३ नुसार "ज्या प्रक्रल्पग्रस्त कुटुंबांचे पुर्णत: पुनर्वसन झाले आहे " अशा कुटुंबांना म.ग्रा.रो.ह.यो. च्या निकषानुसार २.९० लक्ष रक्कम देय आहे. त्यानुसार भंडारा जिल्हयात एकूण ११९५९ लाभार्थ्यांपैकी नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम रु. २.९० लक्ष याप्रमाणे पुर्णत: बाधित ४३३१ लाभार्थ्यांना रु.१२५.५९९ कोटीचे वाटप करण्यात आले आहे.

शासन निर्णय आर.पी.ए.२०१५/प्र.क्र.९९ र-१ मंत्रालय मुंबई दि. १९/०८/२०१५ अन्वये अ, ब, आणि क या व्यतिरिक्त कलम १३(१) च्या अधिसुचनेच्या दिवशी गावात रहीवास करत असल्याबाबत इतर कोणी दावा दाखल केल्यास व ते कुटुंब पुनर्वसन कायद्यात नमुद कुटुंबांच्या व्याख्येनुसार आवश्यक अटीची पुर्तता करीत असल्यास त्यांना योग्य पुराव्याच्या तपासणी अंती नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कमेचा लाभ देय ठरतात. त्या अनुषंगाने सन १९९७ च्या विधानसभेच्या मतदार यादीचा आधार घेवनूच वाढीव कुटुंबांची शिर्षक नोंद वही तयार करण्यांत येवून भंडारा जिल्हयातील ६९९ पात्र बाधित कुटुबांना प्रती कुटुंब रु.२.९० लक्ष याप्रमाणे नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम रु.२०.२७ कोटी इतकी रक्कम वाटप करण्यात आलेली आहे.

ज्या प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे पुर्णत: पुनर्वसन झालेले आहे अशा कुटुंबाना नोकरी ऐवजी रु. २.९० लक्ष एकमुस्त रक्कम देण्याचे शासनाचे धोरण आहे. अंशत बाधित प्रकल्पग्रस्त कुटुंबाना वरील रक्कम देय नाही. गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत अंशत बाधित कुटुंबांची संख्या साधारणपणे ३५००० इतकी असून या सर्व अंशत बाधित कुटुंबांना वरील लाभ दयावयाचा झाल्यास त्याकरिता

सर्वसाधारणपणे रु.१००० कोटी इतका आर्थिक भार अपेक्षित आहे. तसेच सदरचा लाभ भंडारा जिल्हयातील अंशत बाधित गावातील अंदाजे ४००० लाभार्थ्यांना अदा करावयाचा झाल्यास शासन तिजोरीवर अंदाजे रु. १२० कोटी एवढा अतिरिक्त भार पडणार आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत हा प्रस्ताव व्यवहार्य वाटत नाही.

जिल्हाधिकारी, भंडारा कार्यालयाकडून गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त कुटुंबांना एकूण ३२३३ व्यक्तींना प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २७.८.२००९ अन्वये प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्तींना शासकीय सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील भरतीबाबत प्राथम्यक्रम दिला असून, प्रकल्पग्रस्तांसाठी एकूण जागेच्या ५% आरक्षण देण्यात आले असून त्यानुसार शासकीय नियुक्तीचे वेळी कार्यवाही करण्यात येते.

शासन निर्णय दिनांक १८.६.२०१३ अन्वये निवाडयानुसार शिर्षक नोंदवही तयार करण्यात आली असून लाभार्थ्यांना लाभ वाटपाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यानुसार भंडारा जिल्हयातील पुर्णत: बाधित, अंशत: बाधित व पर्यायी गावठाण मिळून एकूण १२९५२ लाभार्थ्यांपैकी ११९५९ लाभार्थ्यांना एकूण प्राप्त रु. ४०४.२९ कोटी रकमेपैकी रु. ३५७.८३ कोटी रकमचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरीत लाभार्थी ७/१२ मध्ये एकापेक्षा अधीक नावे असल्यामुळे, आपसात संमती नसणे, आपसी वाद, न्यायालयीन प्रकरणे इत्यादी कारणामुळे प्रलंबित असून वाटप करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

*************

२८

# सन २०२० अर्थसंकल्पिय अधिवेशन

## महाराष्ट्र विधान सभा लक्षवेधी सूचना

**श्री.सुधीर मुनगंटीवार,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे:-**

**"मुंबईतील मुलूंड येथील रहिवासी असलेल्या सौ.भारती चौधरी या गायत्री महिला सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष असणे,या संस्थेच्या माध्यमातुन त्या महिलांविषयक सामाजिक कार्य अग्रेसर असणे, दि.२९.१२.२०१९ रोजी काही महिलांची अकरम अंसारी या इसमाने आर्थिक फसवणुक केल्याप्रमाणे महिलांना घेवून पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करावयास जात असताना त्यांच्या मारोती एर्टीगा या वाहनाला चंदर यादव यांनी डॅश मारणे, या प्रकरणाबाबत त्यांनी १०३ क्रमांकावर कॉल करुन झाल्या प्रकाराबाबत अवगत करणे , त्यानंतर वरिष्ठ पोलिस निरिक्षक संजय दळवी यांनी त्यांना गाडीत बसवून पोलिस ठाण्यात आणणे, पोलिस निरिक्षक दळवी यांनी त्यांच्या वयावरुन अश्लील टिपणी करणे , अपघात नोंदणीची कार्यवाही झाल्यानंतर सौ.चौधरी यांनी जावू देण्याची विनंती केली असता पोलिस निरिक्षकांनी त्यांना जाणीवपूर्वक डांबवून ठेवणे,नवघर पोलिस स्टेशनमध्ये गेल्या आठवडयात तुम्ही गुटख्याच्या गाडया अडविल्या होत्या काय अशी विचारणा पोलिस निरिक्षकांनी सौ.भारती यांना टॉर्चर करणे,सौ.चौधरी यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करुन त्यांचा शारिरिक छळ करणे, त्यांना पोलिस वाहनात बसवताना पुरुष पोलिसांनी त्यांच्या शरिराला हात लावत अतिशय घाणेरडे वर्तन करणे,त्यांचे चारित्र्य हनन करणे, या संदर्भात सौ.भारती चौधरी यांनी सर्व वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी करुनही त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात न येणे, हा एकुणच घटनाक्रम महिलांच्या सुरक्षीततेसमोर प्रश्न चिन्ह उभा करणारा असणे , या संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन पोलिस निरिक्षक दळवी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष,परिणामी महिलांमध्ये पसरलेला तिव्र असंतोष,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया ."**

---

### मा. मंत्री (गृह) यांचे निवेदन

विक्रोळी पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक खंडागळे, पोशि श्री.पवार, पोशि श्री. हासे हे दिनांक २९/१२/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजताचे सुमारास विक्रोळी -७ मधून पोलीस हद्दीत चैन स्नॅचिंग प्रतिबंधक गस्त करीत असतांना पुर्व द्रुतगती महामार्ग,सर्विस रोडवर, दक्षिण वाहिनी,सोप गोदरेज कंपनीसमोर,विक्रोळी पुर्व,मुंबई येथे एक मो/टेम्पो क्र.एम-०४-एचडी-६४६० व टेम्पोच्या समोर एक पांढ-या रंगाची इर्टीगा मो.कार क्र.एम-०४-एफडब्यलू-५००१ भिंतीजवळ संशयास्पदरित्या उभी होती व एक महिला व एक पुरुष टेम्पो चालकाशी बोलत होते. त्यांचेवर संशय आल्याने त्यांनी गाडी थांबवून खाली उतरुन सदर ठिकाणी चौकशी करीत असतांनाच वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.संजय दळवी हे सदर ठिकाणावरुन पेट्रोलिंग करीत जात होते. विक्रोळी -७ मोबाईल उभी असलेली पाहून ते थांबले व चौकशी केली असता, सदर ठिकाणी उभ्या असलेल्या इंर्टीगा गाडीमधील महिला श्रीमती भारती दामोदर चौधरी व त्यांच्यासोबत असलेल्या दोन इसमांनी प्रतिबंधित गुटख्याची वाहतुक करणारा टेम्पो क्र.एम-०४-एचडी-६४६० अडवला असून टेम्पोचा चालक श्री.दिपक गुप्ता यांचेकडे गाडी सोडायची असल्यास रु.५ लाख दयावे लागतील असे सांगून पैशाची मागणी करीत आहेत असे समजले. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय दळवी यांनी नमुद टेम्पोचे शटर उघडून पाहिले असता त्यात प्रतिबंधित गुटखा भरलेल्या गोणी असल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी तिन्ही जणांना कायदेशीर

कारवाईसाठी पोलीस ठाणेस आणले. कारचा अनोळखी चालक घाईगडबडीत पळून गेला. सदर टेम्पोचालक दिपक भुवलजी गुप्ता याने नमुद महिला व इसमांविरुध्द तक्रार दयायची असल्याचे सांगितल्याने त्यांचा सविस्तर जबाब नोंद करुन त्याने दिलेल्या तक्रारीवरुन श्रीमती भारती दामोदर चौधरी, वय ५२ वर्षे व चंद्रभान गोविंदप्रसाद यादव, वय ३२ वर्षे यांचेविरुध्द विक्रोळी पोलीस ठाणेस गु.र.क्र.५२३/२०१९, कलम ३४१,३८५,१७०,३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद केला.

आरोपित महिला भारती चौधरी व चंद्रभान गोविंदप्रसाद यादव यांचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आले. श्रीमती चौधरी यांना अटक करतेवेळी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत पालन करण्यात आले आहे. अटक आरोपी श्रीमती भारती दामोदर चौधरी यांना महिला अंमलदारासोबत व श्री. चंद्रभान गोविंदप्रसाद यादव,यांना पुरुष अंमलदारासोबत वैदयकीय तपासणीसाठी पाठविले असता श्रीमती चौधरी यांनी पोलीस ठाणे अंमलदार कक्षात गोंधळ घातला व वैदयकीय तपासणीसाठी टाळाटाळ करु लागल्या. सदरबाबत ठाणे दैनंदिनी क्र.२५/१९,दि.२९/१२/२०२० अन्वये नोंद घेण्यात आली आहे. तद्नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल,विक्रोळी येथे वैदयकीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर त्यांना भांडूप पोलीस ठाणे येथील लॉकअपमध्ये सुरक्षितेकरीता ठेवण्यात आले होते. दिनांक ३०/१२/२०१९ रोजी नमूद अटक आरोपी व सह आरोपी यांना मा.न्यायालयाने ताब्यात घेऊन नंतर रु.२५,०००/- चे जामीनावर मुक्त केले. सदर गुन्हयाचा तपास पूर्ण झाला असून आरोपितांविरुध्द मा.महानगर दंडधिकारी,विक्रोळी मुंबई दिनांक ११/०२/२०२० रोजी दोषारोपपत्र दाखल केले असून त्याचा कोर्ट केस क्र.४०९/ps/२०२० असा आहे.

दिनांक २९/१२/२०१९ रोजी प्रतिबंधित गुटख्याची वाहतुक केली म्हणून टेम्पो क्र.एम-०४-एचडी-६४६ ० व त्यातील गुटखा पंचनाम्याअंतर्गत जप्त करुन त्याबाबतचा अहवाल फुड ॲण्ड ड्रग्स विभागास दि.२९/१२/२०१९ अन्वये पाठविण्यात आला होता. दिनांक ०३/०१/२०२० रोजी फुड ॲन्ड ड्रग्ज विभागाचे निरीक्षक यांनी टेम्पो चालक दिपक भुवलजी गुप्ता, यांच्याविरुध्द विक्रोळी पोलीस ठाणेस गु.र.क्र..०३/२०२०,कलम-१८८,२७१,२७३ भादवि सह अन्न सुरक्षा व मानके कायदा,२००६ कलम २६(२)(i),२६(२) (iv), २७(३) (म)३(प)(अ),३०(२)(a)अन्वये गुन्हा नोंद करुन अटक करण्यात आली. व.पो.नि.श्री.संजय दळवी व विक्रोळी पोलीस ठाणेचे इतर अधिका-यांनी सदर घटनेची सखोल-चौकशी करुन सत्य परिस्थिती उघड करुन आरोपीत व त्यांच्या सहका-यांविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यामुळे त्यांच्या मनात व.पो.नि.श्री.संजय दळवी व इतर अधिका-यांविरुध्द राग आहे. तसेच विक्रोळी पोलिसांनी कोणताही पक्षपात न करता आरोपित महिला व प्रतिबंधित गुटखा वाहतुक करणा-या टेम्पो चालकावर योग्य ती कायदेशीर कारवाई केलेली आहे.

---

## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन

**मा. डॉ. देवराव होळी, श्री. कृष्णा गजबे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"गडचिरोली जिल्हा हा उद्योग विरहीत जिल्हा असून सन २००७ पासून गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यात सुरजागड येथे एकमेव लोह प्रकल्पाच्या उत्खनणाचे काम सुरु होणे, काम सुरु झाल्याने जिल्ह्यातील हजारो स्थानिक लोकांना त्यातून रोजगार उपलब्ध होणे, सुरजागड हे ठिकाण दुर्गम क्षेत्रात येत असल्याने असामाजिक तत्वांचा प्रभाव त्या क्षेत्रात असणे, नियमित सुरु असलेल्या या लोह प्रकल्पाचे काम माहे जानेवारी २०१९ च्या जाळपोळीच्या घटनेंनतर अचानक बंद पडणे, पोलिस अधीक्षक गडचिरोली यांनी या महत्वपूर्ण प्रकल्पास सुरक्षा पुरविण्यास नकार दिल्याने हा प्रकल्प दिनांक १६ जानेवारी २०१९ पासून आजतायागत बंद अवस्थेत असणे, उत्खनणाचे काम सुरक्षेअभावी बंद असल्यामुळे जिल्ह्यातील हजारो स्थानिक लोकांचा रोजगार बंद होणे, परिणामी शेकडो कुटुंबावर उपासमारीची पाळी येणे, हा प्रकल्प बंद झाल्याने जिल्हयातीलच नव्हे तर विदर्भातील हजारो लोकांचा रोजगार हा हिरावला जाणे, गडचिरोली जिल्ह्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण असणाऱ्या या प्रकल्पाचे काम सुरु होण्याची आवश्यकता सदरहू प्रकल्प तातडीने सुरु करण्यासंदर्भात तातडीने परवानगी देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया".

---

## मा. गृहमंत्री यांचे निवेदन

गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यात सुरजागड येथे लोह प्रकल्पाच्या उत्खननाचे काम सुरु होते. सुरजागड हे ठिकाण दूर्गम भागात येत असुन माहे जानेवारी २०१९ मध्ये गुरुपल्ली कर्रेम फाट्याजवळ एस.टी.बस व ट्रकमध्ये झालेल्या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला. सदर घटनेनंतर संतप्त जमावाने १६ ट्रकांची जाळपोळ केली व सुरजागड लोहप्रकल्प बंद करण्यासाठी आंदोलन केले. सदर आंदोलनानंतरही दि. ४/३/२०१९, ६/३/२०१९, १२/३/२०१९, १४/३/२०१९ पर्यंत प्रकल्पाचे काम पोलीस बंदोबस्तात सुरु होते. त्यामुळे दि. १६ जानेवारी, २०१९ च्या घटनेनंतर पोलीस बंदोबस्ताअभावी सदर प्रकल्प बंद आहे, ही बाब खरी नाही. सदर प्रकल्प तातडीने सुरु करुन प्रकल्पाला सुरक्षा पुरविणे संबंधात ५ पैकी २ पोलीस मदत केंद्र १) नेडेर (आलदंडी), २) येलचिल मंजूर झाले आहेत. त्याकरीता प्रत्येकी ५ अधिकारी व ४५ पोलीस कर्मचारी असे एकूण १० पोलीस अधिकारी व ९० पोलीस कर्मचारी इतके संख्याबळ मंजूर करण्यात आले असून दोन्ही पोलीस मदत केंद्र कार्यान्वीत आहेत. सदर प्रकल्प तातडीने पुन्हा सुरु करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

रोहे T/एच-१६५९[७५०-३-२०]५

सूचना क्र.३३

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन

**श्री.दिलीप मोहिते-पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"खेड तालुक्यातील सरकारी गायरान मध्ये कोट्यवधी रुपयाचे बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन करुन चोरी केल्याप्रकरणी मा.महसूल मंत्री यांना दिनांक ८/१/२०२० रोजी निवेदन दिले असणे, मौजे आंबेठाण, वाकणी, शिन्देवही, सावरा, खालुम्ब्रे, वराळे शेलू या गावातून तसेच मौजे कुरुळी मधील गट क्रमांक ६७९/५८ जमिनीमधून सुमारे ८०००० ब्रास व गट क्रमांक ६७९/६२/१ मधून ४०००० ब्रास गौण व मौजे बोरदरा मधील गट क्रमांक ४५२, ४८९, ४९० व ८१२ मधून ८०००० ब्रास गौण खनिजाचे अवैध उत्खनन व चोरीस तहसीलदार खेड यानी मदत करणे, ह्या व अशा बऱ्याच प्रकरणामध्ये सुमारे २००००० ब्रास गौण खनिजाचे चोरी झाल्याचे निदर्शनास आलेली असणे, तसेच त्यामुळे शासकीय महसूलाचे सुमारे ८ कोटी रुपयाचे नुकसान झाले असणे आणि पर्यावरणाची कधीही न भरुन येणारी हानी झालेली असणे, अशाच प्रकारे खेड तालुक्यात अनेक ठिकाणी अवैध अनेक गौण खनिज परवाने देऊन तेथे मोठ्या प्रमाणावर अवैध गौण खनिज उत्खननास तहसीलदार श्रीमती आमले यांनी प्रोत्साहन देऊन शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणावर बुडवलेला असणे, आणि असे असूनही प्रशासनाकडून त्यांचेवर कोणतीही कारवाई न होणे यामुळे खेड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर असंतोष आहे. त्याबाबत शासनाने तत्काळ सखोल चौकशी करुन शासनाचा बुडीत झालेला महसूल त्यांचेकडून वसूल करुन त्यांच्यावर सेवा समाप्ती ची कारवाई करावी."

---

## श्री.बाळासाहेब थोरात, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

खेड तालुक्यातील सरकारी गायरान जमिनीमध्ये गौण खनिजाचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन दि.१७/१/२०२० रोजी प्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांना शासनपत्र, दिनांक १४/२/२०२० अन्वये चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

मौजे आंबेठाण, वाकी, शिंदे, सावरदरी, खालुंब्रे, वराळे व शेलू या गावातून १२०७४ ब्रास मुरुमाचे अवैध उत्खनन झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांना तहसिलदार, खेड यांनी दि.७/१०/२०१६, दि.२३/३/२०१८, दि.२४/१२/२०१९, दि.३१/१२/२०१९ व दि.१/२/२०२० अन्वये एकूण रु.४,४१,६२,९८१/- एवढ्या दंडाचे आदेश पारित केले आहेत. तसेच संबंधितांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ मधील तरतूदीनुसार महसूलाची थकबाकी वसूल करण्याकरीता तहसिलदार, खेड यांनी नोटीस बजावली आहे.

मौजे कुरुळी येथील गट नं.६७९/५८ व ६७९/६२/१ मध्ये संबंधित तलाठी यांनी दि.७/३/२०२० रोजी पाहणी केली असता सदर गट खाजगी मालकीचे असून सद्यस्थितीत कोठेही उत्खनन झाल्याचे आढळून आले नाही.

मौजे बोरदरा, ता.खेड येथील जमीन गट नं.४५२ मध्ये पोल्ट्री व्यवसाय सुरु असून गट नं.४८९ व गट नं.४९० मध्ये दि.२९/११/२०१९ रोजी पाहणी करुन २२०० ब्रास मुरुमाचे अवैध उत्खनन केल्याप्रकरणी संबंधितांना दि.२८/१/२०२० व दि.२८/२/२०२० रोजी नोटीस बजावण्यात आली असून सुनावणी सुरु आहे.

मौजे बोरदरा येथील गट नं.८१२ मधील क्षेत्र १०५.६० हेक्टर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे नावे व ५८.२८ हे क्षेत्र वन विभागाच्या नावे आहे. वन रक्षक यांनी उक्त वन क्षेत्रातील अनधिकृत उत्खननाबाबत अज्ञात व्यक्तीविरुध्द विभागीय वन अधिकाऱ्यास पाठवावयाचे वन अपराध पहिले प्रतिवृत्त दि.९/१२/२०१९ रोजी पाठविले आहे. तसेच तहसिलदार, खेड यांनी गट नं.८१२ मध्ये दि.१७/१०/२०१९ रोजी गौण खनिजाचे अवैध वाहतूक करताना २ वाहने पकडण्यात आली असून त्यापैकी एका वाहनाकडे वाहतूक परवाना होता व अन्य वाहनाकडून रु.२,२७,०००/- वसूल करण्यात आले आहेत.

खेड तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरीता मंडल अधिकारी व तलाठी यांची पथके नेमण्यात आली आहेत. तहसिलदार, खेड यांनी माहे ऑक्टोबर, २०१८ ते आजतागायत अनधिकृत वाहतूक करणाऱ्या ५६ वाहनांकडून रु.८४,४९,६९९/- एवढ्या दंडाची रक्कम वसूल करुन २ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच गौण खनिजाचे अनधिकृत उत्खनन झालेल्या ६५ प्रकरणांपैकी २७ प्रकरणांमध्ये १६७६० ब्रास मुरुम, ३२२३ ब्रास माती, ६ ब्रास वाळू असे एकूण १९९८९ ब्रास गौण खनिजाच्यापोटी रु.७,०४,८२,३७१/- एवढ्या रक्कमेचे दंडात्मक आदेश पारीत करण्यात आले आहेत. तसेच ३८ प्रकरणांमध्ये ६५८० ब्रास मुरुम, १२२० ब्रास माती असे एकूण ७८०० ब्रास गौण खनिजाचे अनधिकृत उत्खनन केल्याप्रकरणी दंडात्मक आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही तहसिलदार, खेड यांचे स्तरावर सुरु आहे.

********

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन

**सर्वश्री.अमित झनक, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री.पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, सुरेश वरपुडकर, विक्रमसिंह सावंत, चंद्रकांत जाधव, ऋतुराज पाटील, संजय जगताप, विकास ठाकरे, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री.मोहनराव हंबर्डे, बळवंत वानखडे, राजु पारवे, राजु आवळे, हिरामण खोसकर, राजकुमार पटेल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

**"ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर मौजे घोडबंदर येथे सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनीच्या माध्यमातून उभारण्यात येत असलेल्या अपना घर प्रकल्पामध्ये सदर कंपनीला महसूल विभागाने ७९ कोटी ४२ लाख रूपयांचा दंड ठोठावण्यात येणे, या प्रकल्पासाठी पर्यावरण विभागाची परवानगी घेण्यात आलेली नसणे, सदर प्रकल्पाला दंड भरेपर्यंत स्थगितीची नोटीस दिली असताना बांधकाम सुरू असणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, पर्यावरण विभागाची परवानगी नसतानाही काम सुरू असल्याने या प्रकरणाची चौकशी करून कठोर स्वरूपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."**

### श्री.बाळासाहेब थोरात, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे घोडबंदर येथील स.नं.२५/१, २५/२, २५/३, १११/१/१, १११/१/२, १११/१/४, १११/१/५, ११२/१, ११२/४, ११८/१, ११९/२ या जमिनीवर मे.सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन प्रा.लि. कंपनीने ७६३२५ ब्रास मातीचा अनधिकृत भराव केल्याबाबत रु.७९,३७,८०,०००/ तसेच ५२ ब्रास दगडाचा साठा केल्याबाबत रू.४,६२,८००/- असे एकूण रु.७९,४२,४२,८००/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश दि.३०/०९/२०१६ रोजी पारीत केले होते.

सदर आदेशाविरुध्द मे.सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन प्रा.लि., या कंपनीने उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्याकडे अपिल दाखल केले असता उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या दि.४/१०/२०१७ रोजीच्या आदेशान्वये तहसिलदार, ठाणे यांचे दि.३०/०९/२०१६ रोजीचे आदेश रद्द करणेत आले असून या प्रकरणामध्ये तहसिलदार, ठाणे यांना फेरचौकशी करण्याचे आदेश देणेत आले आहेत. याबाबत तहसिलदार, ठाणे (सध्या अपर तहलिसदार, मिरा भाईंदर) यांचे स्तरावर प्रकरणामध्ये नोटीस देवून सुनावणी दि.१३/०३/२०२० रोजी निश्चित केली आहे.

सदर प्रकल्पाच्या १६४३४.९९ चौ.मी. क्षेत्राकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिलेली असून एकूण बांधकाम क्षेत्र २०,००० चौ.मी. च्या मर्यादेत असल्याने सदर प्रकल्पास शासन धोरणानुसार पर्यावरण विभागाच्या परवानगीची आवश्यकता नसल्याचे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे. सदर प्रकल्पाला दंड भरेपर्यंत स्थगितीची नोटीस दिली असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

रोटा H/1571-1 (750-03-2020)

******************

३९

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन

**श्री. नरेंद्र भोंडेकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"विद्यमान तहसीलदार (ता. पवनी जि. भंडारा) यांनी अनागोंदी कारभार करून रेती माफियांसोबत संगनमताने पवनी तालुक्यात लिलाव न झालेल्या रेती घाटातून बेकादेशीररित्या अवैध रेतीचा उपसा करणे, अवैध वाहतुकीमुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढणे, शासनाचा कोट्यवधी रूपयाचा महसूल बुडवून वैयक्तिक लाभासाठी अधिकाराचा दुरूपयोग करून गैरप्रकार केल्याने, स्थानिक लोकप्रतिनिधी द्वारे दिनांक २८/०१/२०२० रोजी वा त्या सुमारास मा. मंत्री महसूल व वने, अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग यांना लेखी तक्रारीत निलंबित करण्याची मागणी करणे. तसेच रेतीच्या अवैध वाहतुकीमुळे गावपातळीवरील अंतर्गत रस्ते खराब होणे, त्यामुळे शासनाच्या दुर्लक्षितपणामुळे नागरिकामध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, यावर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी लिलाव न झालेल्या रेती घाटातील किती ब्रास रेती चोरी गेली याची तपासणी भूजल सर्वेक्षण विभागाकडून तात्काळ करून घेणे, व त्या आधारे रेती माफियाशी साठगाठ करून शासनाचे कोट्यवधी रूपयाचा महसूल बुडविणाऱ्या तहसीलदाराविरूध्द दंडात्मक वसुलीची व फौजदारी कार्यवाही करणे, परिणामी जेणेकरून वैयक्तिक लाभापोटी या पुढे शासनाचा कुठलाही महसूल अधिकारी, अधिकाराचा दुरूपयोग करून महसूल बुडविणार नाही या हेतूने कडक कारवाई करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

### श्री. बाळासाहेब थोरात, मंत्री (महसूल) यांचे निवेदन

स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२८.१.२०२० च्या पत्रान्वये पवनी तालुक्यात रेती घाटाचे लिलाव झाले नसतांना तहसीलदारांच्या पुढाकाराने मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन सुरू असून सदर अधिकाऱ्याला निलंबित करण्याची मागणी केली आहे. त्याअनुषंगाने शासनपत्र दि.७.२.२०२० अन्वये विभागीय आयुक्त, नागपूर यांना स्वयंस्पष्ट अभिप्रायांकित अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.

भंडारा जिल्हयातील पवनी तालुक्यात अवैध रेती उत्खनन व वाहतूकीबाबत बऱ्याच तक्रारी प्राप्त होत असल्याने पवनी तालुक्यातील तहसिलदार यांची स्वतंत्ररित्या चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकारी, भंडारा यांनी दि.१३.११.२०१९ च्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, भंडारा यांना कळविले होते. त्याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी, भंडारा यांनी दि.२९.११.२०१९ रोजी सादर केलेल्या अहवालामध्ये तहसिलदार, पवनी यांनी अवैध गौण खनिजाचे उत्खनन व वाहतुकीवर कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही, पवनी तालुक्यातील मौजा भोजापूर, खातखेडा, येनोळा, वलनी येथील रेतीघाटातून खूप मोठ्या प्रमाणावर अवैध रेतीचा उपसा केल्याचे व साठवणूक केल्याचे आढळून आले आहे. तहसिलदार, पवनी व तालुका प्रशासन अवैध रेती उत्खनन व वाहतुकीवर आळा घालण्याकामी अपयशी ठरत असल्याचे दिसून येत आहे, तहसिलदार, पवनी यांचे पोलीस यंत्रणेसोबत समन्वय असल्याचे दिसून येत नाही, अशा प्रकारचा अहवाल सादर केला आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, भंडारा यांनी विभागीय आयुक्त, नागपूर यांना तहसिलदार, पवनी यांच्या बदलीचा प्रस्ताव दि.३०.११.२०१९ रोजी सादर केला. विभागीय आयुक्त, नागपूर यांनी दि. २७.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार. पवनी यांच्या बदलीचा प्रस्ताव शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

*************

छोटा/प्रत - 1594 (750-3 2020)

महाराष्ट्र विधानसभा सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन

**सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, श्री.अतुल भातखळकर, ॲड. पराग अळवणी, श्री.राणा जगजीतसिंग पाटील, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, मंदा म्हात्रे, राम कदम, अभिमन्यू पवार, संतोष दानवे, सुनिल प्रभू, डॉ.देवराव होळी, कृष्णा गजबे, दौलत दरोडा, राजेश पवार, नामदेव ससाने, नरेंद्र भोंडेकर, राजू कारेमोरे, सुरेश भोळे, श्रीमती यामिनी जाधव, श्री.बालाजी कल्याणकर, संजय गायकवाड, बळवंत वानखेडे, अमीन पटेल, विनोद निकोले, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री अमित झनक, विकास ठाकरे, श्रीमती सीमा हिरे, श्री.अबू आजमी, ॲड. आशिष जयस्वाल, ॲड. राहूल कुल, सर्वश्री जयकुमार गोरे, भिमराव तापकीर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

**"तुमसर व मोहाडी (जि.भंडारा) येथे मोठ्या प्रमाणामध्ये रेती घाटाचे प्रमाण अधिक असल्याने रेती चोरी रोखण्यासाठी महसूल व पोलीस प्रशासन यांनी आपली वेगळी भरारी पथके तयार करणे, परंतु सदर भरारी पथके सर्वत्र रेती घाटाच्या ठिकाणावर न फिरणे त्याउलट विशिष्ठ ठिकाणावर जाऊन रेती चोरीवर आळा घालणे, पोलीसांचे भरारी पथकाला मोहाडी तालुक्यातील करडी, देव्हाडा, वरठी येथील चोरी रोखण्यासाठी पथक तयार करणे, परंतु तुमसर तालुक्याची या पथकाला जबाबदारी न देणे, सर्वाधिक १४ ते १५ रेती घाट तुमसर तालुक्यात असणे, यामुळे सर्वाधिक रेती चोरी तुमसर तालुक्यातच होणे याच ठिकाणी भरारी पथक न येणे त्यामुळे रेती चोरी करणाऱ्या रेती माफियांना मोठ्या प्रमाणात झालेला लाभ, यावरुन महसूल व पोलीस प्रशासन रेती माफियाशी साठगाठ करुन रेती माफियांना चोरीसाठी अप्रत्यक्षरित्या मुभा देण्याचा होत असलेला गैरप्रकार, या गैरप्रकाराने शासनाचे कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडणे, सर्रास अवैध रेती चोरी प्रकरणामुळे गावातील अंतर्गत रस्ते खराब होणे, रस्ते खराब झाल्याने शासनाचे कोट्यवधी रुपयाचे झालेले नुकसान, तसेच पर्यावरण अनुमती घेण्यासाठी जनसुनावणी घेणे बंधनकारक केल्याने राज्यात पर्यावरण अनुमती न मिळणे, याउलट अवैध वाहतुकीमुळे तालुक्यात गुन्हेगारीच्या प्रकारात अधिक वाढ झाल्याने सामाजिक सुरक्षा धोक्यात येणे, रेती माफियाशी स्थानिक यंत्रणेची साठगाठ असल्याने शासनाने तात्काळ दखल घेवून सखोल चौकशी करुन दोषींविरुध्द करावयाची कडक कार्यवाही व प्रतिक्रिया."**

## श्री.बाळासाहेब थोरात, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

भंडारा जिल्ह्यात अवैध रेती उत्खनन व ओव्हरलोड वाहतुकीवर आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून प्रत्येक तालुक्यात महसूल व पोलीस विभागाचे संयुक्त बैठे पथक व भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. तसेच एका तालुक्यातील भरारी पथक दुसऱ्या तालुक्यात जाऊन आकस्मिक भेटी देवून अवैध व ओव्हरलोड वाहतुकीवर कार्यवाही करीत आहेत.

रोटा H/1582 (750-03-2020) ..... २ .....

भंडारा जिल्ह्यातील अवैध उत्खनन व वाहतूकीवर आळा घालण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत असून तुमसर तालुक्यात भरारी पथकांनी केलेल्या कारवाईत माहे एप्रिल, २०१९ ते फेब्रुवारी, २०२० या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या २२ प्रकरणात रु.२८,५०,५३९/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करून शासनजमा करण्यात आली आहे व १२ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच मोहाडी तालुक्यात ५६ प्रकरणात रु.४०,३५,६२४/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली असून १० प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पर्यावरण विभागाने दि.०३/१२/२०१९ रोजीच्या शासन पत्रान्वये मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांच्या दि.१३/०९/२०१८ रोजी दिलेल्या आदेशामधील निर्देशानुसार ०५ हेक्टर ते २४ हेक्टर एवढे क्षेत्र असलेल्या गौण खनिज (वाळूगट) प्रकल्पास पर्यावरण अनुमती मिळण्याबाबत राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण/ समिती यांच्याकडे प्रस्ताव सादर करतांना EIA/ EMP तयार करणे व जनसुनावणी घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर मा.लवादाच्या निर्देशानुसार केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून सर्वसमावेशक Form 1 M बनविण्याबाबतची कार्यवाही झालेली नसल्यामुळे मा.लवादाच्या सदर आदेशामध्ये नमुद केल्यानुसार ० ते ५ हेक्टर क्षेत्र असलेल्या गौण खनिज (वाळूगट) प्रकल्पास पूर्व पर्यावरण अनुमती मिळण्याबाबत प्रस्ताव सादर करताना जनसुनावणी घेणे बंधनकारक करण्यात आले असल्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे लिलाव प्रक्रिया राबविण्यापूर्वी राज्यातील वाळूगटास पर्यावरण अनुमती घेणे बंधनकारक केल्याने लिलाव प्रक्रिया राबविण्यास विलंब होत असल्याची वस्तुस्थिती आहे.

भंडारा जिल्ह्यातील जिल्हा व तालुकास्तरावरील भरारी पथकांनी केलेल्या कारवाईत माहे एप्रिल, २०१९ ते फेब्रुवारी, २०२० या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या २८५ प्रकरणात रु.४,१८,९९,१५९/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करून शासनजमा करण्यात आली आहे व ५४ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

***********

H/1582-R

# लक्षवेधी सूचना

## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्री अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. प्रशांत ठाकूर, ॲड आशिष शेलार, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, ॲड पराग अळवणी, सर्वश्री. संजय केळकर, किसन कथोरे, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, राधाकृष्ण विखे-पाटील, रणधीर सावरकर, बंटी भांगडिया, डॉ. देवराव होळी, सर्वश्री किशोर जोरगेवार, कृष्णा गजबे, विनोद अग्रवाल, सुधीर मुनगंटीवार, अबु आझमी, रईस शेख, डॉ. संजय कुटे, ॲड राहुल कुल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

" राज्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेची स्थिती बिकट असल्याचे केंद्रीय ग्रामीण आरोग्य अहवालातून निदर्शनास आल्याची बाब माहे जानेवारी २०२० च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांची ५० टक्के तर प्राथमिक आरोग्य केंदावरील (पीएचसी) ७ टक्के पदे रिक्त असणे, निमवैद्यकीय पदे ही मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याचे अहवालात नमुद करणे, राज्यात सन २००५ ते २०१९ या काळात ग्रामीण रुग्णालय आणि पीएचसी वरील लोकसंख्या वाढली तरी त्या तुलनेत डॉक्टर, परिचारिकासह निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांचा तुटवडा असणे, यामुळे ग्रामीण जनतेला अनेक समस्येचा सामना करावा लागत असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. श्री. राजेश टोपे, मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन

भारत सरकार प्रतिवर्षी ग्रामीण आरोग्य अहवाल प्रसिध्द करीत असते. सन २०१८-२०१९ चे अहवालानुसार महाराष्ट्रात १०६६८ उपकेंद्रे, १८२८ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ५०२ ग्रामीण रुगणालये व त्यावरील संस्था कार्यान्वित आहेत. त्यामार्फत ग्रामीण जनतेस आवश्यक त्या आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

केंद्र शासनाच्या अहवालानुसार डॉक्टरांची कमतरता असली तरी प्राथमिक आरोग्य केंद्रात ८ टक्के पदे रिक्त आहेत व ग्रामीण रुग्णालयात २५ टक्के पदे रिक्त आहेत. सदरहू रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने नियमित वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरण्यासाठी शासन निर्णय दि.२६.०२.२०१६ व दि.२४.०६.२०१६ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला अधिकार देण्यात आले आहेत. तसेच कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची पदे भरण्यासाठी दि.०२.०३.२०१५ व दि. ०३.१२.२०१८ नुसार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीस अधिकार देण्यात आले आहेत.

त्यामार्फत रिक्त पदे भरण्यात येतात. तसेच दि.१३.०६.२०१९ च्या शासन निर्णयान्वये कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे.

वैदयकीय अधिकारी गट अ च्या रिक्त पदांवर बंधपत्रित वैदयकीय अधिकारी व जिल्हास्तरीय समितीमार्फत कंत्राटी वैदयकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येते. राज्यात वैद्यकीय अधिकारी, गट अ (वेतनस्तर S-२०: ५६१००-१७७५००) या संवर्गात १७८४ कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, वैद्यकीय अधिकारी, गट अ (वेतनस्तर S-२३: ६७७००-२०८७००) संवर्गातील अधिकाऱ्यांची पदोन्नतीने पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, गट क कर्मचाऱ्यांची सरळ सेवेने पदे भरण्याची व गट-ड ची पदे भरण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

विभागातील आरोग्य संस्थांमार्फत मागील वर्षी ५.७५ कोटी रुग्णांना बाह्यरुग्ण विभागात सेवा देण्यात आल्या. ४३.२१ लक्ष रुग्णांना आंतररुग्ण विभागात सेवा देण्यात आल्या. मागील्त वर्षी २,११,५१४ मोठ्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या आणि २,९२,५५८ छोट्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तसेच मागील वर्षी २,८७,६०९ सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या रुगणालयातून सर्व रुग्णांना निदानात्मक सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. यावर्षी निदानात्मक चाचण्या सुविधेअंतर्गत ४५५९८९ क्ष-किरण, २५२१३ सी.टी. स्कॅन, १७७५५९ सोनोग्राफी सेवा देण्यात आलेल्या आहेत.

उपलब्ध मनुष्यबळामार्फत सर्व रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येते.

**********

H/1613-19

# लक्षवेधी सूचना

## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा. डॉ. राहूल आहेर वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" राज्यात विशेषत: ग्रामीण भागांतील प्राथमिक आरोग्य कंद्रांमध्ये एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या ऐवजी बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रतिमाह रु. ४० हजार मानधनावर नेमणूक करण्याबाबत शासन निर्णय आरोग्य विभाग दिनांक ४ जुलै, २०१९ अन्वये तरतूद केली असणे, संपूर्ण राज्यात साधारणत: १३०० च्या आसपास बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी मानधनावर कार्यरत असल्याचे निदर्शनास येणे, तथापि मागील ५ महिन्यांपासून संबधीत वैद्यकीय अधिकाऱ्यांना मासिक वेतन न मिळाल्याने ते प्रचंड आर्थिक अडचणीत असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, याच दरम्यान एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी उपलब्ध झाल्यास बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासनाकडून तात्काळ कार्यमुक्त करण्यात येत असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, परिणामी ग्रामीण भागामध्ये बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, जिल्हा रुग्णालयांच्या धरतीवर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आयुष विभाग स्थापन करण्याची आवश्यकता, बंधपात्रीत, नियमित एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांना ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालयांमध्ये नियमित नेमणूक देण्यात आल्यास बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांना कार्यमुक्त न करता अन्य प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये किंवा ग्रामीण रुग्णालयांमध्ये सामावून घेण्याची आवश्यकता, त्यांच्या मानधनात प्रतिवर्षी किमान ८ टक्के वाढ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यावाही व प्रतिक्रिया."

..............................................................................................

**मा. श्री. राजेश टोपे, मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन**

राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात वैद्यकीय अधिकारी गट-अ पदावरील पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याचे आढळून आल्याने तसेच नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होण्यास कालावधी लागत असल्याने सदर भागात अत्यावश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासन निर्णय दि. ०२.०३.२०१५ अन्वये वैद्यकीय अधिकारी गट-अ रिक्त पदांवर कंत्राटी पध्दतीने निव्वळ एमबीबीएस अर्हताधारक व त्यातील पदव्युत्तर पदवी/पदविका अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत धारेण निश्चित केले आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ०३.१२.२०१८ अन्वये

या नेमणुका करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस प्रदान करण्यात आले आहे. उपरोक्त निर्णयानंतरही पुरेसे एमबीबीएस अर्हताधारक उमेदवार प्राप्त होत नसल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एमबीबीएस अर्हताधारक उमेदवार मिळेपर्यंत बीएएमएस अर्हताधारकांमधुन कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी शासन निर्णय दि. ०४.०७.२०१९ अन्वये सर्व जिल्हाधिकारी यांना शासनस्तरावरुन कळविण्यात आले आहे. तसेच सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना ०४ जुलै, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदिवासी व दुर्गम भागासाठी रु. ४५,०००/- व इतर भागासाठी रु.४०,०००/- मानधन देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार राज्यात एकुण ६६८ बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या मानधनासाठी संबंधित लेखाशिर्षात पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने तात्पुरत्या स्वरुपात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामधून निधी प्राप्त करुन त्यांचे वेतन अदा करण्यात आले आहे. सद्यस्थितीत डिसेंबर, २०१९ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणी मंजूर झाली असून सर्व कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांचे वेतन देण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर निधी वितरीत करण्यात आला आहे.

बीएएमएस कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांच्या नियुक्तीबाबतच्या शासन निर्णय दि. ०४.०७.२०१९ नुसार नियमित एमबीबीएस वैद्यकीय अधिकारी उपलब्ध झाल्यास कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा समाप्त करणे क्रमप्राप्त आहे.

महाराष्ट्र राज्यात सन २०२२ पर्यंत एकुण १८२८ प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच १०६६८ उपकेंद्र व ६०५ शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतरण आरोग्य वर्धीनी केंद्रात करावयाचे आहे. त्यासाठी सद्यस्थितीत महाराष्ट्रात ११४१ उपकेंद्राच्या ठिकाणी बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांना समुदाय वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

**********

(८४)

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. मदन येरावार, डॉ. अशोक उईके, श्री. नामदेव ससाने, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"यवतमाळ नगरपालिकेच्या विकास आराखडयातील आरक्षण क्र.८६ शिट क्र.३८-सी, प्लॉट नं.३१/१ वर बी.ओ.टी. तत्वावर दुकान केंद्र बांधण्यास शासनाकडून परवानगी मिळणे, मात्र अफ्रन्ट प्रिमीयम दर ८३ कोटी रुपये मंजूर असल्याने तीन वेळा ईनिविदा काढूनही निविदेस प्रतिसाद न मिळणे, अफ्रन्टची किंमत २० ते ३० टक्क्यांनी कमी करण्यासाठी यवतमाळ नगर पालिकेने शासनाकडे वारंवार विनंती करणे, विनंती मान्य न झाल्यामुळे मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जागेपासून मिळणाऱ्या कोटयवधी रुपयांच्या महसुलापासून शासनाला वंचित राहावे लागणे, शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या जागेवर अतिक्रमणची शक्यता होऊन बी.ओ.टी. वरील प्रकल्पास विलंब होणे, याबाबत शासनाने गंभीर्यपूर्वक निर्णय घेऊन सदर आरक्षण क्र.८६ शिट क्र.३८-सी, प्लॉट नं.३१/१ वर बी.ओ.टी. तत्वावरील दुकान केंद्र बांधकामासाठी अफ्रन्टची किमंत कमी करणेबाबत कारवाई करण्यात यावी यावर शासनाने करावयाची तत्काल उपाययोजना व प्रतिक्रिया."

श्री. एकनाथ शिंदे, मा. मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

यवतमाळ नगरपरिषदेच्या हद्दीतील शिट क्र.३८-सी, प्लॉट नं.३१/१ ही जागा सन १९९८ च्या शहर मंजूर विकास आराखड्यात आरक्षण क्र.८६ - दुकान केंद्र, शॉपिंग कॉम्लेक्स याकरीता आरक्षित आहे. यामधील १६५७५.४० चौ.मी. जागा सार्वजनिक आंरोग्य विभागाच्या मालकीची होती. सदर जागेच्या आरक्षणानुसार विकास होण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने सदर जागा नगरपरिषद यवतमाळ यांना वितरीत होण्याकरीता दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये महसूल विभागास हस्तांतरीत केली आहे. महसूल व वन विभागाने दिनांक १६ मार्च, २०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर जागेची एकूण किंमत रुपये ४५,५९,०४,२२६/- इतकी रक्कम नगरपरिषद यवतमाळ यांच्याकडून टप्याटप्याने घेऊन आगाऊ ताबा देण्याबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना कळविले. नगरपरिषदेने जागेची रुपये ९ कोटी इतकी रक्कम मार्च, २०१७ मध्ये महसूल विभागास प्रदान केली आहे. उर्वरित

रक्कम B.O.T. च्या मिळणाऱ्या उत्पन्नातून प्रथम अदा करावी, असा निर्णय तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आला.

सदर जागेवर नियमानुसार २९,९०२ चौ.मी. बांधकाम अनुज्ञेय असून नगरपरिषदेने जागेची Upfront प्रिमियमची किंमत रुपये ५५ कोटी इतकी ठरविली होती. त्यामध्ये जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी स्थानिक नगररचना व मुल्य निर्धारण अधिकारी यांच्याशी सल्लामसलत करुन Upfront प्रिमियमची किंमत रुपये ८३ कोटी आकारणे उचित राहील, असे प्रस्तावित केले. जिल्हाधिकारी, यवतमाळ तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांची शिफारस विचारात घेऊन शासनाने दिनांक २४ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये सदर जागेवर B.O.T. तत्वावर दुकान संकुल बांधून ते विकासकास ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टावर देण्यास व हस्तांतरीत करण्यास काही अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता दिली आहे. त्यामध्ये नगरपरिषदेने जाहिर प्रकटन करताना त्यात Upfront प्रिमियमची रक्कम रुपये ८३ कोटी इतकी नमूद करावी या अटीचा समावेश करण्यात आला.

नगरपरिषदेने रुपये ८३ कोटी Upfront प्रिमियमची रक्कम विचारात घेऊन निविदा प्रथमत: दिनांक १९/९/२०१९ रोजी प्रसिद्ध केली. तथापि, त्यास कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. नगरपरिषदेने त्यानंतर दिनांक ७/११/२०१९ रोजी दुसऱ्यांदा निविदा प्रसिद्ध केली. तथापि, त्यास देखील प्रतिसाद मिळाला नाही. अंतिमत: नगरपरिषदेने दिनांक १२/१२/२०१९ रोजी तिसऱ्यांदा निविदा प्रसिद्ध केली आहे. परंतु त्यासही एकही निविदेचा प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. त्यामुळे नगरपरिषदेने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्यामार्फत दिनांक ५/३/२०२० रोजी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे, Upfront प्रिमियमची रुपये ८३ कोटी इतकी रक्कम २० ते ३०% ने कमी करुन मिळावी, जेणेकरुन निविदेस प्रतिसाद मिळू शकेल, असा प्रस्ताव सादर केला आहे. त्याबाबत त्वरित उचित निर्णय घेण्यास संचालनालयास कळविण्यात आले आहे.

***********

पत्र-१६३७-१३१

८५

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. मदन येरावार, डॉ. अशोक उईके, श्री. नामदेव ससाने, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

**"यवतमाळ नगर पालीकेने B.O.T. तत्वावरील विकास आराखडा आराखडा आरक्षण क्र.१०१ या जागेवर दुकानकेंद्र व सांस्कृतीक भवन इमारत बांधकाम प्रकल्प शासनाकडे मंजुरीसाठी सादर केलेले असणे, सदर प्रस्तावाला मंजुरात मिळाली नसल्यामुळे शहराच्या मध्यवर्ती स्थानी असलेल्या या जागेला डंपीग ग्राऊंडचे स्वरुप येणे, या जागेला लागून मुलींचे वसतीगृह, महिला विद्यालय, विद्युत विभाग कार्यालय, अमराईपुरा आदि रहिवासी वस्ती असल्यामुळे दुर्गंधी व आरोग्याच्या गंभीर प्रश्न निर्माण होणे, बांधकामास मंजुरी न मिळाल्यामुळे दुकानगाळे व सांस्कृतिक केंद्रापासून येणाऱ्या महसुलाचे नुकसान होऊन शासनाला कोटयवधी रुपयाचा फटका बसणे, दुकान गाळयांमुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होऊन उदरनिर्वाहाचे साधन निर्माण होणे, याबाबत शासनाने गांभीर्यपूर्वक निर्णय घेऊन सदर आरक्षण क्रमांक १०१ वर दुकान केंद्र व सांस्कृतिक भवन B.O.T. तत्वावर बांधकामाच्या प्रकल्पास मंजुरी देण्याबाबत कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची तत्काळ उपाययोजना व प्रतिक्रिया."**

<u>श्री. एकनाथ शिंदे, मा. मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन</u>

यवतमाळ नगरपरिषदेच्या मालकीची शिट क्रमांक ३८-ए आणि बी, भूखंड क्रमांक ८, ९/१ मधील ७४३५.२० चौ.मी. जागा शहर मंजूर विकास आराखड्यात आरक्षण क्रमांक १०१ - दुकान संकुल व सांस्कृतिक भवन यासाठी आरक्षित आहे. सदर जागेचा B.O.T. तत्वावर विकास करण्यासाठी नगरपरिषदेने सन २०१४ मध्ये ठराव घेऊन मंजूरी दिली. याबाबत नगरपरिषदेने वित्तीय अहवाल (Financial Report) तसेच सुसाध्यता अहवाल (Feasibility Report) तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागार नेमून अहवाल तयार करुन घेतला.

मात्र या टप्प्यावर नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या ९२ मधील तरतूदीनुसार सदर जागा विकासकास दीर्घ मुदतीच्या भाडेपट्याने हस्तांतरीत करण्यासाठी निविदा काढण्यापूर्वी शासन मान्यता घेणे आवश्यक होते. त्यानुसार

नगरपरिषदेने सदरचा प्रस्ताव दिनांक ६/११/२०१५ रोजी शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या मार्फत तसेच आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालनालय, वरळी, मुंबई यांच्यामार्फत सादर करणे आवश्यक होते. त्यानुसार नगरपरिषदेने शासनास सादर केलेला प्रस्ताव शासनाने दिनांक ८/१२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये अभिप्रायासह सादर करण्यासाठी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांना पाठविला. परंतु शासन मान्यतेची प्रतिक्षा न करता यवतमाळ नगरपरिषदेने निविदा काढण्याचा निर्णय घेऊन, दिनांक २५/४/२०१७ रोजी निविदा प्रसिद्ध करुन दिनांक ८/११/२०१७ रोजी ठराव क्रमांक ३८ अन्वये सर्वाधिक बोली रुपये ५,०५,०५,०५०/- असलेल्या वारको असोसिएट्स, यवतमाळ यांच्या निविदेस मंजूरी दिली. त्यानंतर नगरपरिषदेने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्यामार्फत दिनांक २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव पुन्हा मंजुरीस्तव सादर केला.

शासनाकडून नगरपालिका प्रशासन संचालनालयाच्या प्रस्तावाची प्रतिक्षा करण्यात येत होती. त्यासाठी संचालनालयाला शासनाने दिनांक ३०/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये स्मरणदेखील करण्यात आले. यासंदर्भात नगरपालिका प्रशासन संचालनालयाने त्यांचे अभिप्राय देऊन नुकताच प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यामध्ये, प्रकल्पातून मिळणारी अधिमुल्याची रक्कम नगररचना कार्यालयाशी विचारविनिमय करुन रुपये ५ कोटी ऐवजी रुपये १८ कोटी इतकी ठरविली आहे. तसेच रुपये ५ कोटी अधिमुल्याच्या आधारे राबविण्यात आलेली निविदा प्रक्रिया रद्द करण्याची देखील शासनास शिफारस केली आहे.

***************************

टाच- ९६३६-९३१

e३

# महाराष्ट्र विधान सभा

## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन

### लक्षवेधी सूचना क्रमांक-९३

श्री समिर मेघे, सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ९३ पुढीलप्रमाणे आहे:-

"नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील गुमगाव परिसरात दिनांक ३.३.२०२० रोजी वा त्या सुमारास सोसाट्याच्या वादळासह अवकाळी पाऊस पडणे, या पावसामुळे गहू, हरभरा, तूर तसेच भाजीपाला पिकांचे अतोनात नुकसान होणे, अचानक आलेल्या पावसाने शेतक-यांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल होणे, काही ठिकाणी बोराच्या आकाराच्या गारपीट पडणे, परिसरातील झाडे उन्मळून पडणे, गावातील सखल भागात पाणी साचणे, शेतक-यांच्या घरांचे पत्रे उडून जाणे, वीज पुरवठा खंडीत होणे, नुकसान भरपाई मिळण्यासाठी शासनाकडे शेतक-यांनी मागणी करणे, झालेल्या नुकसान भरपाईचे तातडीने पंचनामे करून शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

राज्यात माहे फेब्रुवारी व मार्च, २०२० या कालावधीत अवेळी पाऊस व गारपीट यामुळे शेतीपिके/फळपिकांचे झालेल्या नुकसानीबाबत आपदग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली आहे. याबाबत कृषि विभाग आणि महसूल विभाग यांनी संयुक्त पंचनामे करून अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना दि.०२.०३.२०२० च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

************

(८४)

महाराष्ट्र विधान सभा

सन २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक ९४</u>

सर्वश्री राजू कारेमोरे, विनोद अग्रवाल, नरेंद्र भोंडेकर, सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ९४ पुढील प्रमाणे आहे.

"तुमसर जिल्हा भंडारा व ता. मोडाडी येथील जांब व आंबागड क्षेत्रात ५००० एकरातील टोमॅटो शेतीला कीड लागल्यामुळे पिक उध्वस्त झाल्याने शेतक-यांवर आर्थिक संकट कोसळणे या प्रकरणी शेती पिकाचे हवामानातील बदलामुळे टोमॅटो पिकावर आजार ओढवल्याने शेतक-यांचे झालेले प्रचंड नुकसान, या प्रकरणी महसूल व कृषी विभागाने स्वतंत्र सर्व्हेक्षण करून झालेल्या पिकांची नुकसानीची मागणी, स्थानिक नुकसानग्रस्त शेतक-यांमार्फत, निवेदनामार्फत दिनांक २२/०१/२०२० या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींना होणे शासनाने याची तात्काळ दखल घेऊन मोहाडी व तुमसर क्षेत्राची झालेल्या टोमॅटो पिक नुकसानीची पाहणी करण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रीया."

## मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

"भंडारा जिल्ह्यामध्ये तुमसर व मोहाडी येथील जांब येथील एकूण ४२५.५० हे. आर. क्षेत्रावरील टोमॅटो पीकाचे नुकसान झाले आहे. तथापि, आंबागड ता तुमसर येथील शेतक-यांचे टोमॅटो पिकाचे नुकसान झालेले नाही. भंडारा जिल्ह्यामध्ये तुमसर व मोहाडी येथील जांब येथील एकूण ४२५.५० हे. आर. या बाधित क्षेत्राचे संयुक्त पंचनामे करण्यात आलेले असून रू. ६१,०८,७५०/- मदत निधीबाबतचा अहवाल विभागीय आयुक्त, नागपूर यांचे कडून प्राप्त झाला आहे.

************

रोटा/एच १६९७ [७५०-७-२०२०]·

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२० चे द्वितीयअधिवेशन (अर्थसंकल्प)

मा. श्री. सुनिल प्रभू विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४९९० पुढीलप्रमाणे आहे -:

" मुंबईतील भायखळा पूर्व येथील सर ज.जी. समुह रुग्णालय व कामा रुग्णालयात गेली २० वर्षापासून ६ अंशकालीन महिला कर्मचारी यांचेसह ग्रॅड शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वर्ग १ ते वर्ग ४ या संवर्गातील १३१ रिक्त पदे भरण्याची शासनाने २ वर्षापूर्वी जाहीर करुनही अद्याप शासनातर्फे रिक्त पदे भरण्यात आली नसल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, वित्त व सामान्य प्रशासनाच्या मान्यतेसाठी गेली २ वर्षापासून संबंधित प्रश्न प्रलंबित असणे, गेली २० वर्षापासून ४१८ रुपये इतक्या अल्प वेतनावर काम करणाऱ्या ६ महिला कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणेबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी शासनास पत्राद्वारे शिफारस करुनही त्याची शासनाकडून दखल घेण्यात न येणे, सद्यस्थितीत सदरहू महिलांचे वय नियमबाहय असल्याने त्यांना अन्यत्र कोठेही नोकरी मिळत नसणे, २० वर्षे रुग्णालयात सेवा देऊनही त्यांना सेवेत कायम न करता शासनाकडून त्यांच्यावर झालेला अन्याय, माहे एप्रिल २०१६ रोजी शासनाने सदरहू ज.जी. रुग्णालयातील ७७४ बदली कामगारांना सेवेत कायम करणे त्याच धर्तीवर सदरहू ६ अंशकालीन माहिलांना सेवेत कायम करुन महाविद्यालयातील वर्ग १ ते ४ मधील १३१ रिक्त पदे तातडीने भरणेबाबत निर्णय घेऊन शासनाने रुग्णांना सुरळीत आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, परिणामी सर ज.जी. रुग्णालयातील अन्यायग्रस्त कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

मा.श्री.अमित देशमुख, मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे निवेदन

---

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई व सेंट जॉर्ज रुग्णालय, मुंबई या दोन्ही संस्थेत एकुण ६ अंशकालीन लिपीक सन १९९७ ते २००० या कालावधीपासून कार्यरत आहेत. त्यांच्या सेवा नियमित करण्याकरीता कौशल्य विकास व उद्योजकता विभाग व सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले होते. "सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य" या योजनेतून शासनाच्या विविध कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपात काही तासांकरीता काम करुन मानधन देण्यात येत असलेल्या योजनेतून पदवीधर अंशकालीन या घटकाची निर्मिती झाली आहे. काही कालावधीनंतर सदर योजनेची फलनिष्पती न झाल्याने दि.११.२.२००४ रोजीच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेत सुधारणा करुन त्याऐवजी "सुशिक्षित बेरोजगारांच्या सेवासोसायटयांना आर्थिक सहाय्य" अशी योजना सुरु करण्यात आली. या योजनेमध्ये ज्या पदवीधर उमेदवारांनी ३ वर्षे काम केले आहे अशा उमेदवारांच्या अनुभवाची नोंद सेवायोजन

रोटा/४च-1606 (750-3-2020) कृ.मा.प...

कार्यालयात ठेवण्यात येत होती. ३ वर्षाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना विहीत मार्गाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी शासनाने १० टक्के समांतर आरक्षण लागू केले असून या पदावर सरळसेवेने शासन सेवेत येण्यासाठी कमाल वयोमर्यादेत ४६ वर्षापर्यंत शिथीलता देण्यात आली आहे. अशा अंशकालीन उमेदवारांना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याचे कोणतेही धोरण नाही.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्थेतील ६ कर्मचारी हे ३ वर्षे अनुभव प्रमाणपत्र धारण करीत असल्याची नोंद सेवायोजन कार्यालयाकडे नसल्याने ते पदवीधर अंशकालीन उमेदवार नसल्याचे अभिप्राय कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने दिलेले आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागाने सुध्दा या ६ कर्मचाऱ्यांच्या सेवा शासन परिपत्रक दि. २५.८.२००५ मधील मार्गदर्शक सुचना विचारात घेता, नियमित करता येणार नाहीत असे स्पष्ट अभिप्राय दिलेले आहेत. या सर्व कारणांमुळे या ६ कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करता येणार नाहीत.

ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई या संस्थेत गट-अ ते गट -ड या संवर्गातील एकुण ७६४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ६१५ पदे भरलेली असून उर्वरीत १४९ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांपैकी अध्यापकीय पदे निवडमंडळामार्फत तसेच पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांच्या ७५ टक्के तसेच पदोन्नतीच्या कोटयातील केवळ खुला प्रवर्गातील पदे भरता येत असल्याने पदे रिक्त राहतात. गट-क तांत्रिक संवर्गातील १७ पदांच्या सेवाप्रवेश नियमात सुधारणा करण्याची कार्यवाही चालू असून उर्वरीत गट-क ची पदे भरण्यासाठी सामायिक लेखी परीक्षा आयोजित करण्याची कार्यवाही संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्यामार्फत करण्यात येत आहे. गट-ड ची पदे बाहयस्त्रोतामार्फत भरण्याचे धोरण असल्याने सदर पदे सरळसेवेने भरता येत नाही. तथापि गट-ड संवर्गातील वारसाहक्काची व अनुकंपा तत्त्वावरील पदे भरण्यात येत आहेत.

**********

वैद्य-1606-1ल

## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

**डॉ. पंकज भोयर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

"मागील वर्षीच्या उन्हाळ्यात म्हणजेच माहे एप्रिल, २०१९ ते माहे सप्टेंबर, २०१९ या कालावधीत वर्धा तालुक्यातील वर्धा शहर व लगतच्या मोठ्या ग्रामपंचायतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई असणे, स्थानिक नागरिकांना आठ ते दहा दिवसाआड पाणी मिळणे, वर्धा शहर पाणीपुरवठा व शहरालगतच्या पिपरी(मेघे) पाणी पुरवठा योजना या दोन्ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनाचे शिर्षस्थळ असलेल्या येळाकेळी pickup Weir मध्ये पाणी उपलब्धी नसल्याने वरील दोन्ही पाणी पुरवठा योजनांमध्ये टंचाई निर्माण होणे, या गंभीर समस्येची दखल घेत तत्कालीन पालक सचिव यांनी दि. १४.०५.२०१९ रोजी वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयात तातडीची बैठक घेणे, तसेच, तात्कालीन मा.पालकमंत्री यांनी दि. १२ जुलै, २०१९ रोजी या गंभीर समस्येवर उपाय काढण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनूसार धान नदीवरील महाकाली धरणावरुन वर्धा शहर व पिपरी (मेघे) व शहरातगतच्या १३ मोठ्या सिंधी (मेघे), सावंगी (मेघे), बोरगाव (मेघे), वरुड उमरी(मेघे), सालोड, दत्तपुर, कारला, साटोडा, आलोडी, नालवाडी, म्हसाळा, वायगाव या गावांच्या पाणी पुरवठा योजनांकरिता लागणारे पाणी येळाकेळी Pickup Wire पर्यंत आणण्याकरिता गुरुत्वनलिका टाकण्याचे निर्देश देणे, परंतु अजूनपर्यंत स्थाणनिक प्रशासनाकडून व संबंधित महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जलसंपदा विभाग यांच्या समन्वय नसल्याने परिपुर्ण प्रस्ताव तयार न होणे, यावर्षीचा उन्हाळ्या येण्याअची वेळ आली असली तरी राज्य सरकारकडून अजूनपर्यंत सदर कामाला प्रशासकीय मान्यता न मिळणे, परिणाम स्वरुप यावर्षी देखील वर्धा शहरातील व आजूबाजूच्या मोठ्या गावातील नागरिकांमध्ये पाणी टंचाईबद्दल भिती निर्माण होणे, या पाणी टंचाईच्या संकटातून वर्धा वासियांना वेळेच्या आत मुक्त करण्याची आवश्यकता, याबाबत राज्य सरकारने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन

वर्धा शहर पाणी पुरवठा योजना व पिंपरी (मेघे) व १३ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना या दोन्ही योजनांचे शिर्षस्थळ असलेले येळाकेळी पिकअपविअर मध्ये सन २०१९ च्या उन्हाळयात पाणी उपलब्ध नसल्याने पाणी टंचाई निर्माण झालेली होती. येळाकेळी येथील स्रोताकरिता महाकाली धरणातुन अंदाजे २४ कि. मी. अंतरावरुन नदीद्वारे येळाकेळी पिकअपविअर मध्ये पाणी येते व पुढे १३ कि. मी. अंतरावर असलेल्या पवनार बॅरेज पर्यंत जाते.

**************

यात नदीद्वारे पाणी आणल्यास जवळपास ५० % पाण्याचा अपव्यय (Water Loss) होतो. या संदर्भात पालक सचिव व मा. पालकमंत्री, जिल्हा वर्धा यांनी दिलेल्या निर्देशानुसार धाम नदीवरील महाकाली धरणावरुन वर्धा शहर, मार्गस्थ १३ गांव व पिपरी (मेघे) व १३ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना यासाठी लागणारे पाणी येळाकेळी पिकअपविअर पर्यंत आणण्याकरिता गुरुत्व नलिका टाकण्याच्या कामाचा प्रस्ताव तयार करण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आले. यामध्ये मार्गस्थ १३ गावांकरिता गावालगत जोडण्या प्रस्तावित केलेल्या आहेत. त्यानुसार महाकाली धरणाच्या मुख्य विमोचका पासुन येळाकेळी पिकअपविअर पर्यंत गुरुत्व वाहिनी टाकण्याचे कामाचे सर्वेक्षण करुन सविस्तर आराखडे व अंदाजपत्रके रु. ५२२९.०५ लक्ष किंमतीचे अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.स.स. कक्ष, मुंबई यांना दिनांक ३१.०७.२०१९ रोजी सादर करण्यात आले. सदर प्रस्तावावर काही मुद्याची पुर्तता करण्याकरिता प्रस्ताव दिनांक १६.०९.२०१९ रोजी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्याकडे परत करण्यात आला.

दरम्यान जलसंपदा विभागाने मुख्य विमोचका पासुन पाणी देणे शक्य नसल्याचे कळवुन शिर्षस्थळाची जागा बदलली, यामुळे गुरुत्वा द्वारे पाणी येळाकेळी पिकअपविअर पर्यंत येणे शक्य नसल्याने, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक मंडळ, चंद्रपुर व अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपुर यांनी संयुक्तरित्या दिनांक ०६.०२.२०२० रोजी शिर्षस्थळाची पाहणी केली व गुरुत्व वाहिनी मुख्य विमोचका पासुन ( Head Regulator) निघणा-या कालव्यापासून टाकण्याचे ठरले. त्यानुसार रु. ७२००.४३ लक्ष ढोबळ किंमतीचे अंदाजपत्रक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.स. कक्ष, मुंबई यांना सादर केलेल्या प्रस्तावातील मुद्दयांची पूर्तता करण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

सदर गुरुत्व वाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीच्या खर्चाबाबत नगर परिषद, वर्धा यांचा ठराव झालेला आहे. तसेच, मार्गस्थ १३ गावांपैकी ६ गावांचा ठराव झालेला आहे.

वर्धा शहर, पिंपरी मेघे व १३ गावे योजनेतंर्गत गावे, व प्रस्तावित योजनेतील मार्गस्थ १३ गावे या ठिकाणी सन २०१९ च्या उन्हाळयात काही अंशी पाणी टंचाई निर्माण झाली होती. त्याकरिता टंचाईअंतर्गत अत्यावश्यक उपाययोजना घेण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत सदर क्षेत्रात पाणी टंचाईची परिस्थिती नाही. तथापि, या क्षेत्रातील काही गावे संभाव्य टंचाई कृती आराखडयात समाविष्ट असून आवश्यकतेनुसार टंचाई निवारणाच्या उपाययोजना राबविण्याचे प्रस्तावित आहे.

**************

लक्षवेधी सूचना

९०८

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. प्रशांत ठाकूर, ॲड. आशिष शेलार, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, अतुल भातखळकर, राणाजगजीतसिंह पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. राम कदम, अभिमन्यु पवार, संजय केळकर, कालीदास कोळंबकर, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. सुनिल प्रभू, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. शांताराम मोरे, महेंद्र दळवी, भरतशेठ गोगावले, बंटी भांगडिया, डॉ. देवराम होळी, सर्वश्री. कृष्णा गजभिये, किशोर जोरगेवार, ॲड. आशिष जयस्वाल, श्री. प्रमोद पाटील, ॲड. राहुल कुल,वि.स.स. यांनीमहाराष्ट्रविधानसभानियम १०५अनुसारदिलेलीलक्षवेधीसुचनापुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये आवश्यक सोयी सुविधा नसल्याने आदिवासी विद्यार्थांची दैयनीय अवस्था झाल्यची बाब माहे जानेवारी, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, मागील तीन वर्षात २८२ विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू, यापैकी २८ टक्के मुलांच्या मृत्यूचे कारण समजू शकलेले नसणे, मुरबाड येथील वसतीगृहात इयत्ता बारावीत शिकणाऱ्या मुलाचा मृतदेह दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास शेजारील जंगलात आढळून येणे, पेण आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थीनीचे मृत्यु होणे याबाबत आश्रमशाळेतील तीन कर्मचारी निलंबित करणे, या घटनांची शासनाने चौकशी करण्याची आवश्यकता असतानाही चौकशी न होणे, घुलेवाडी (ता. संगमनेर, जि. अहमदनगर) येथील शासकीय आदिवासी वसतीगृहात निकृष्ट जेवण दिले जात असल्यामुळे वसतिगृहातील २५० विद्यार्थांनी दिनांक ०३ फेब्रुवारी २०२० रोजी पासून सुरु केलेले अन्नत्याग आंदोलन, त्यामुळे सदर विद्यार्थ्यांची होत असलेली उपासमार, दिनांक ०४ फेब्रुवारी २०२० रोजी नाशिक येथील आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त आणि सदर विद्यार्थ्यांमध्ये संपन्न झालेल्या बैठकीत विद्यार्थ्यांनी वसतिगृहातील निकृष्ट जेवणाबाबत गंभीररीत्या तक्रारी करुन जेवण करणाऱ्या ठेकेदाऱ्याविरोधात ठोस कारवाई करण्याबाबत केलेली मागणी, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत वसतिगृहाच्या प्रवेशद्वाराला आतून टाळे ठोकून ठोस निर्णय झाल्याशिवाय अन्नत्याग आंदोलन मागे न घेण्याचा केलेला निर्धार, या संपूर्ण प्रकरणाची विनाविलंब चौकशी होऊन ठेकेदाराविरोधात तक्रारी करुनही संबंधित अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे संबंधितांविरोधात जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरोधात ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्वाही व प्रतिक्रिया."

---

## मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन

### आश्रमशाळेमध्ये आरोग्य सेवेकरीता उपलब्ध करण्यात आलेली विशेष व्यवस्था.

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात ४९९ शासकीय आश्रमशाळा असून सन २०१७-१८ ते सन २०१९-२०२० पर्यंत शासकीय आश्रमशाळांमध्ये राज्यात २७२ विद्यार्थ्यांचा मृत्यु झालेला आहे. सदर

मृत्यु विविध कारणांमुळे झालेले आहेत. त्याबद्दल शासनाने केलेल्या उपाययोजनांची माहिती पुढीलप्रमाणे :-

राज्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये आरोग्यसेवांमध्ये वाढ करीत असताना त्या सेवा दर्जेदार व सर्वसमावेशक असाव्यात याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवे व्यतिरिक्त आदिवासी विकास विभागा मार्फतयासंदर्भात विशेष उपाययोजना करण्यात आली आहे. अटल आरोग्य वाहिनीअंतर्गत राज्यातील दुर्गम भागातील ३०१ शासकीय आश्रमशाळा व ८ एकलव्य निवासी शाळांमध्ये ४८ बेसिक लाईफ सपोर्ट रुग्णवाहीकांच्या माध्यमातून आपत्कालीन सेवा तसेच, नियमित वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते. ३ ते ६ शाळांचा एक क्लस्टर निर्माण करून प्रत्येक एका क्लस्टर मागे एक रुग्णवाहिका पुरविण्यात आली आहे. २४ तास डॉक्टर व चालक यांच्यासह या रुग्णवाहिका वैद्यकीय सेवा पुरविण्यास उपलब्ध असतात. तर उर्वरित २०१ शासकीय आश्रमशाळा व ६ एकलव्य निवासी शाळा याकरिता टेलीमेडीसीन स्वरुपात आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आश्रमशाळांमध्ये भेटी देऊन डॉक्टर नियमित तपासणी करतात. आजारी आढळून आलेल्या रुग्णांवर आश्रमशाळामध्ये उपलब्ध सीक रूम मध्ये उपचार करण्यात येतात. आवश्यकता वाटल्यास विद्यार्थ्यास पुढील उपचारांकरिता रुग्णवाहिकेमार्फत रुग्णालयात नेले जाते. उपचाराच्या पहिल्या टप्प्या पासून ते शेवटच्या टप्प्यापर्यंत डॉक्टरांमार्फत पाठपुरावा केला जातो. वैद्यकीय तपासणी दरम्यान गंभीर आजाराने पिडीत असणाऱ्या निदानित विद्यार्थ्यांना सुपरस्पेशियालिटी रुग्णालयांमध्ये उपचारांकरिता नेले जाते. दोनही योजनांमधील विभागीय वैद्यकीय अधिकारी, रुग्णालय , पालक व शाळा प्रशासन यामध्ये समन्वय साधून उपचार करतात.

अशाप्रकारे एकात्मिक आरोग्य सेवेच्या माध्यमातून सन २०१८ -१९ मध्ये १,३६,१६७ विद्यार्थी तर २०१९-२० मध्ये १,६७,५८२ विद्यार्थ्यांची सखोल वैद्यकीय तपासणी करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांची डिजिटल आरोग्य पत्रिका तयार करण्यात आली आहे. यापैकी ५२,८८२ विद्यार्थ्यांना आश्रमशाळांमधील सीकरूम मध्ये उपचार करण्यातआले. एकूण ९४ विद्यार्थ्यांवर विविध रुग्णालयांमध्ये फ्रॅक्चर, अपेंडिक्स, फुफ्फुसे, मेंदू,शरीरावरच्या विविध गाठी इत्यादींवरयशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली.आपत्कालीन व आवश्यक वेळी २२,६८१ विद्यार्थ्यांना रुग्णवाहिकेमार्फत रुग्णालयामध्ये हलविण्यात आले. ४९ इतके विद्यार्थी हृदय रोगाने निदानित झाले त्यापैकी ३३ विद्यार्थ्यांवर विविध रुग्णालयांमध्ये यशस्वी हृदय शस्त्रक्रिया (ओपन हार्ट सर्जरी, वाल्व्हबदलणे इत्यादी) करण्यात आली. १३विद्यार्थ्यांवर नियमित औषधउपचारद्वारे हृदय रोगावर उपचार करण्यात आले. विविध आजार ज्यांवर शस्त्रक्रिया हा उपाय नाही पण उपचाराअभावी ते जीव घेणे ठरू शकतात ( जसे कि कावीळ, मेंदूज्वर, त्वचा रोग , मलेरिया, हिवताप, मेंदूचे आजार ) असे ९०विद्यार्थ्यांवर नियमित औषध उपचार करण्यात आले. आरोग्य तपासणी मध्ये काही विद्यार्थ्यांना कर्करोगाची लागण झाली असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. तातडीने पुढील तपासण्या

करून, आज निदानित ६ विद्यार्थ्यांवर मुंबई येथील टाटा मेमोरिअल हॉस्पिटल तसेच राज्यातील इतर रुग्णालये येथे कर्करोगावर उपचार करण्यात येत आहेत. आरोग्य सेवा पुरविणारे वैद्यकीय अधिकारी सर्व रुग्णांचा नियमित पाठपुरावा करीत असतात. रुग्णालयात दाखल करणे, तेथील डॉक्टरांशी उपचारांबाबत चर्चा करणे तसेच शस्त्रक्रियेनंतर विद्यार्थ्यांना शाळेत पोहचवून पुढील काळजी घेणे इत्यादी गोष्टींमध्ये व्यवस्थेचा हस्तक्षेप आहे.शाळांमध्ये डॉक्टरांमार्फत ४१८ आरोग्य शिक्षण सत्रे घेण्यात आली. उपचारात्मकआव्हाने पेलताना प्रतिबंधात्मक उपाय महत्वाचे ठरतात. उन्हाळी सुट्यांमध्ये रुग्ण वाहिकेमार्फत गावागावांमध्ये तपासणी शिबिरे व जनजागृती सत्रे आयोजित करण्यात येतात. आज तागायत १,८२७ इतकीगावपातळी वरील आरोग्य सत्रे आयोजित करण्यात आली.

वरील आकडेवारी पाहता सखोल तपासणी मधून निदानित विद्यार्थ्यांवर तातडीने उपचार करून पाठपुरावा केल्याने संभाव्य मृत्यूची शक्यता कमी झाली.क्षेत्रिय स्तरावर उभारण्यात आलेल्या यंत्रणेमुळे व आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने मृत्यूचे नेमके कारण समोर येत आहे. आपत्कालीन सेवा पुरविणारी, तळागाळापर्यंत जाऊन काम करणारी यंत्रणा व आधुनिक तंत्रज्ञानाची मदत यामुळे विद्यार्थ्यांचा आरोग्य दर्जा सुधारत आहे. सदर योजनांच्या सहाय्याने विश्लेषित माहितीच्या आधारे मृत्यू दर कमी होण्याकरिता नेमकी पाऊले उचलून विद्यार्थ्यांचे जीवनमान कसे उंचावेल याकडे आदिवासी विभाग प्राधान्याने लक्ष देत आहे.

आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, मुरबाड, जि.ठाणे येथील कु.बंडु रामा निरगुडा इयत्ता ११ वी या विद्यार्थ्यांचा वसतिगृह इमारतीपासुन अंदाजे ३०० मिटर अंतरावर दिनांक २८/०१/२०२० रोजी सकाळी ८.०० वाजता गळफास लागलेल्या अवस्थेत मृतदेह आढळुन आला. मुरबाड पोलिस स्टेशनमधील पोलीसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करुन रितसर पंचनामा केला. कु.बंडु रामा निरगुडा याचे शव उत्तरीय तपासणीसाठी पालक व सामाजिक संघटनांनी आग्रहधरल्यामुळे जे.जे. रुग्णालय, मुंबई येथे पाठविण्यात आले. व्हीसेरा तपासणी अहवाल बाकी आहे.

मुरबाड पोलिस स्टेशन येथे पालक व आदिवासी संघटना यांनी वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांची चौकशी करण्याबाबत मागणी केल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना मुरबाड पोलीसस्टेशनला चौकशीसाठी नेण्यात आले होते. तसेच उपस्थितकर्मचारीयांचेजबाबनोंदविले आहेत.

वरसई आश्रमशाळेतील विद्यार्थीनीचा मृतदेह आश्रमशाळेपासून ३ ते ४ कि.मी. अंतरावर असलेल्या जंगलात गळफास घेतलेल्या अवस्थेत असल्याची घटना निश्चितच दुर्दैवी आहे. मात्र या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता आदिवासी विकास विभागाच्याप्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांनी कारवाई करत संबंधित २ महिला अधिक्षीका आणि मुख्याध्यापक यांना निलंबित केले आहे. या प्रकरणाचा पोलीस तपास सुरु असून या विद्यार्थीनीच्या कुटुंबियांना रु. २ लाख सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

वरसई आश्रमशाळेत १० वी मध्ये शिकणाऱ्या या विद्यार्थीनीला ४ फेब्रुवारी रोजी तिचे पालक भेटण्यास आले होते. दुसऱ्या दिवशी म्हणजेच ५ फेब्रुवारीला सकाळी आश्रमशाळेत इतर विद्यार्थीनींना तसेच शिक्षकांना काहीही न सांगता ही मुलगी आश्रमशाळेच्या बाहेर पडली. हे आश्रमशाळेतील सीसीटीव्ही फुटेजमध्ये निदर्शनास आले. या मुलीचा शोध घेण्यासाठी आश्रमशाळेकडून त्वरित प्रयत्न करण्यात आले. तिच्या पालकांशी आश्रमशाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक संपर्कात होते. अखेर ६ फेब्रुवारीला दुपारी आश्रमशाळेपासून ३ ते ४ कि. मी. अंतरावर असलेल्या जंगलात या विद्यार्थीनीने एका झाडाच्या फांदीला गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणाचा तपास सुरु आहे.

शासकीय आदिवासी मुलांचे वसतीगृह नविन संगमनेर, ता.संगमनेर, जि. अहमदनगर येथे दि.३/२/२०२० पासुन वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी निकृष्ट जेवणामुळे अन्नत्याग आंदोलन सुरु केले होते. आदिवासी मुलांचे घुलेवाडी शासकीय वसतीगृह, संगमनेर येथील विद्यार्थीनींनी केलेल्या मागणीनुसार आदिवासी विकास विभागामार्फत मागील ८ महिन्यात ३ ठेकेदारांचे ठेके रद्द करण्यात आले असून सध्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनातील मागणीनुसार चौथा भोजन ठेकेदार नेमण्यात येत आहे. याशिवाय मुंढेगाव मध्यवर्ती स्वयंपाकगृह येथून भोजन पुरवठा किंवा थेट लाभ हस्तांतरण योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना भोजन भत्ता पुरविण्याचा पर्याय देण्यात आला आहे.

शासकीय आश्रमशाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याकरीता विशेष उपक्रम तसेच सोयीसुविधांकरीता कायापालट अभियान राबविण्यात येत आहे. शासकीय आश्रमशाळांना फर्निचर, बेंचेस, बेडींग साहित्य, कपाट, गाद्या, खुर्च्या इत्यादी साहित्य पुरविण्यात आले. तसेच शाळेच्या नियमित देखरेख व नियंत्रणाकरिता प्रत्येक शाळेत शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीला किरकोळ दुरुस्तीकरिता शाळा व्यवस्थापन समितीतून निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

-----

सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग

## सन २०२० चे द्वितीस (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.प्रकाश आबिटकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्रमांक १११** पुढील प्रमाणे आहे : -

"महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ चे कलम १० पोट कलम ६ (अ)मध्ये राज्य शासकीय विभाग, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन सहवित्त संस्था आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (१९६१ चा महा.२४) यांच्या कलम ७३ अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवर वर्ग ३ व वर्ग ४ प्रवर्गातील सर्व सेवांमध्ये प्रकल्पबाधीत व्यक्तीच्या नामनिर्देशीतांसाठी रोजगाराकरीता किमान ५ टक्के प्राथम्य कोटा आरक्षित केलेला असणे, कोल्हापूर जिल्हयातील सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, दुध संघ, स्थानिक स्वराज्य संस्था, सरकारी भाग भांडवल घेतलेल्या संस्था, खाजगी शिक्षण संस्था यासह अन्य ४४ मोठया संस्थातील वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या एकूण पद भरतीमध्ये ५ टक्के जागांवर पुर्नवसन कायदयानुसार प्रकल्पग्रस्त बेराजगारांना संधी देणे बंधनकारक असणे, सिंचन प्रकल्पात घर, जमीन गेलेल्या कुटुंबाच्या घरातील बेराजगार प्रकल्पग्रस्त वर्षानुवर्षे नोकरीच्या शोधात भटकंती करुनही वेळेत पुर्नवसन नाही आणि नोकरीही नाही अशी दयनीय अवस्था प्रकल्पग्रस्तांचे होणे, जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांना नोकरीस पात्र असणाऱ्या सहकारी संस्थांची संख्या १२१ हून अधिक असून यामध्ये संस्थांचे संचालक, नेते मंडळीची नातेवाईक व जवळच्या कार्यकर्त्यांना नोकरी भरतीमध्ये प्राधान्य देऊन नोकर भरती केल्याने पुर्नवसन कायदयाचा भंग होणे, याबाबत प्रकल्पग्रस्तांनी वेळोवेळी पुर्नवसन विभागाकडे मोर्चे, आंदोलने करुनही अदयाप कोणतीही कार्यवाही न होणे याबाबत पुनर्वसन विभागाने माहे डिसेंबर,२०१९ वा त्यासुमारास बैठक घेऊन जिल्हयातील साखर कारखाने, सुतगिरण्यासह इतर पात्र संस्थांत प्रकल्पग्रस्तांना ५ टक्के आरक्षणानुसार नोकरी मिळण्याबाबत आढावा घेणे, त्यामध्ये प्रामुख्याने सदरील संस्थामध्ये किती प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेतले आहे ? तसेच सध्या संस्थेमध्ये असणारी एकूण संख्या व भविष्यात करावयाची नोकर भरती याबाबतचे नियोजन असा सविस्तर आढावा घेण्यात येणे, प्रकल्पग्रस्त नोकरभरतीस टाळाटाळ करणाऱ्या गोकूळ दुध संघास अपर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना नजीकच्या काळात नोटीस काढून कारवाई करण्याबाबतचे आदेश देणे, परंतु अदयापही सहकारी संस्थांमध्ये प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्याबाबत उदासिनता दिसून येणे, परिणामी प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून न घेतल्यामुळे जिल्हयातील प्रकल्पांच्या कामास विरोध करणे, यामुळे प्रकल्पांची कामे गेल्या १५ ते २० वर्षापासून बंद अवस्थेत असण्याचे एक कारण असणे, शासनाने कोल्हापुर जिल्हयातील सर्व सहकारी संस्थामध्ये आजमितीस संस्थानिहाय केलेली पद भरतीचा आढावा घेवून जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांना भरती प्रक्रियेमध्ये पुनर्वसन कायदयानुसार ५ टक्के प्रमाणे नोकर भरती करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

## मा.मंत्री (सहकार व पणन) यांचे निवेदन

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ चे कलम १० पोट कलम ६ (अ) मध्ये राज्य शासकीय विभाग, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन सहवित्त संस्था आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० यांच्या कलम ७३ अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवर वर्ग ३ व वर्ग ४ प्रवर्गातील सर्व सेवांमध्ये प्रकल्पबाधीत व्यक्तीच्या नामनिर्देशितांसाठी रोजगाराकरीता किमान ५ टक्के प्राधान्य असेल, अशी तरतूद आहे. त्यानुसार कोल्हापूर जिल्हयातील विविध सहकारी संस्थांमध्ये वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या एकूण पद भरतीमध्ये ५ टक्के जागांवर पुर्नवसन कायदयानुसार प्रकल्पग्रस्त बेराजगारांना संधी देणे बंधनकारक आहे. नोकरभरतीवेळी धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त यांचे आरक्षणाप्रमाणे जागा भरल्या जातात किंवा नाही, याबाबत आयुक्त, पुणे विभाग, पुणे कार्यालयाकडून बैठक घेऊन अपर जिल्हाधिकारी,कोल्हापूर व जिल्हा पुनर्वसन कार्यालयाकडून घेतलेल्या माहितीनुसार जिल्हात एकूण ४४ संस्थांमधील वर्ग-३ व ४ प्रवर्गातील आस्थापनावरील मंजूर १३५०१ पदांपैकी प्रकल्पग्रस्तांसाठी ५ टक्के आरक्षित ६२५ पदांच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त प्रवर्गातील व्यक्तींमधून एकूण १९९ पदे भरलेली आहे व ४०६ पदे रिक्त असल्याचे दिसून येत आहे. सिंचन प्रकल्पात घर व जमिन गेलेल्या कोल्हापूर जिल्हयातील ११९०१ प्रकल्पग्रस्त असून पर्यायी जमिन वाटपास पात्र ६७५१ प्रकल्पग्रस्तांपैकी ५३६१ प्रकल्पग्रस्तांना उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार पर्यायी जमिन वाटप व पात्रतेप्रमाणे भुखंड वाटप करण्यात आलेले आहे. जिल्हा पुनर्वसन कार्यालयाकडून प्रकल्पग्रस्त आरक्षणाबाबत पुनवर्सन कायदयानुसार प्रकल्पग्रस्तांना ५ टक्के आरक्षण पुर्णत: बहुतांशी संस्थांमध्ये दिल्याचे दिसून येत नाही, ही बाब अंशत: खरी आहे. कोल्हापूर जिल्हयातील गोकुळ दुध संघाने प्रकल्पग्रस्तांच्या ५ टक्के आरक्षणाप्रमाणे वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरलेबाबतची माहिती सादर न केल्यामुळे जिल्हा पुनर्वसन कार्यालय, कोल्हापूर यांनी दिनांक १०.०१.२०२० अन्वये महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ चे कलम २१ (५) मधील तरतूदीनुसार संस्थेवर कारवाई करण्यात आली आहे. सदर आदेशाविरुध्द संस्थेने विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे अपील दाखल केले आहे.सदर प्रकरणाची सुनावणी विभागीय आयुक्ताकडे सुरु आहे.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ चे कलम १० पोट कलम ६ (अ) अन्वये सहकारी संस्थांमध्ये नोकरभरतीच्यावेळी प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्याबाबत तरतूद आहे. मात्र, जिल्हयातील प्रकल्पांच्या कामास विरोध करणे, यामुळे प्रकल्पांची कामे गेल्या १५ ते २० वर्षापासून बंद अवस्थेत असल्याचे आढळून आलेले नाही.

*_*_*_*

## महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

सर्वश्री.देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड.आशिष शेलार, श्री.अतुल भातखळकर, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री.अभिमन्यु पवार, दिपक चव्हाण, अशोक पवार, बबनराव शिंदे, नरहरी झिरवाळ, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री.संग्राम जगताप, यशवंत माने, सुनिल शेळके, बाळासाहेब आजबे, शेखर निकम, दौलत दरोडा, संदिप क्षिरसागर, मकरंद जाधव-पाटील, निलेश लंके, सुनिल भुसारा, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री.अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अनिल पाटील, भारत भालके, बाबासाहेब पाटील, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, मानसिंग नाईक, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मराव बाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, नितीन पवार, ॲड.माणिकराव कोकाटे, सर्वश्री.आण्णा बनसोडे, सुनिल टिंगळे, चेतन तुपे, आशुतोष काळे, राजेश पाटील, राजू कारेमोरे, दिलीपराव बनकर, प्रकाश सोळंके, श्रीमती सरोज आहिरे, ॲड.राहूल कुल, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्री. हिरामण खोसकर, अमिन पटेल, पृथ्वीराज चव्हाण, अमित झलक, विक्रमसिंह सावंत, रावसाहेब अंतापूरकर, श्रीमती सुलभा खोडके, श्री.विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. बळवंत वानखेडे, मोहनराव हंबर्डे, सुरेश वरपुडकर, कुणाल पाटील, सुभाष धोटे, चंद्रकांत जाधव, ऋतुराज पाटील, संजय जगताप, प्रमोद पाटील, डॉ.राहूल आहेर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३) अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या सुमारास कळवण-धुळे मार्गावरील धावणारी एस.टी.बस सौंदाणे-देवळा (जि.नाशिक) रस्त्याने मेशी शिवारातून जात असताना तिचा टायर फुटल्याने समोरुन येणाऱ्या रिक्षासह रस्त्याच्या कडेला साठ फुट खोल विहीरीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात चालकासह बसमधील १७ व रिक्षातील ९ प्रवाशांचा झालेला मृत्यू तसेच २८ जण गंभीररित्या जखमी होणे, आगारातून बाहेर पडण्याआधी आपली बस व्यवस्थित आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी कार्यशाळा चालक तसेच बस चालकावर असताना या प्रकरणी कोणतीच जबाबदारी पार पाडली नसल्याने नाहक ओढवलेल्या दुर्घटनेमुळे काहीजण मृत्यूमुखी तर अनेकजण जखमी होणे, अपघातात मृत पावलेले प्रवासी आणि बस चालकाच्या नातेवाईकांना महामंडळातर्फे दहा लाखाची मदत दिली जाईल तसेच जखमी प्रवाशांच्या उपचाराचा सर्व खर्च महामंडळातर्फे दिला जाईल असे मा.परिवहन मंत्री आणि एस.टी. मंडळाचे अध्यक्ष यांनी जाहीर करणे, तर रिक्षातील मृतांच्या वारसांना केवळ २ लाख रुपये मदत देण्याचे जाहीर करणे, सदरहू अपघातातील मृत व्यक्तींच्या वारसांना तर रिक्षामधील मृत व्यक्तींच्या वारसांना आर्थिक मदत देताना जाणिवपुर्वक केलेला भेदभाव, अद्यापही मृतांच्या वारसांना प्रत्यक्षात आर्थिक मदत मिळालेली नसल्याची परिस्थिती तसेच जखमी प्रवाशांना औषधोपचार घेताना सोसाव्या लागणाऱ्या गंभीर समस्या, याप्रकरणी विनाविलंब सखोल चौकशी करुन योग्य ती ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता तसेच एस.टी. बसमधील मृत्यूमुखी पडलेल्या व रिक्षामधील मृत्यूमुखी पडलेल्या मृतांच्या वारसांना आर्थिक मदत देताना तफावत न ठेवता तात्काळ प्रत्येकी दहा लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, तसेच अपघातात बळी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबात कुणी कमवता नसेल तर अशा कुटुंबातील मुलगा किंवा मुलगी यांना परिवहन महामंडळाने तात्काळ नोकरीत सामावून घ्यावे अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, याप्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया."

### नि वे द न

**{ॲड.अनिल परब, मा.मंत्री (परिवहन)}**

दिनांक २८.०१.२०२० रोजी रा.प. नाशिक विभागातील कळवण आगाराची क्र. एम एच ०६ एस ८४२८ ही बस धुळे-कळवण मार्गावर धावत असतांना सुमारे १५.३० वाजता मेशी शिवार, धोबी घाट परिसरात समोरुन येणारी ॲपे रिक्षा

क्र. एम एच १५ डीसी ४२३३ ला धडक बसल्याने राज्य परिवहन बस व ॲपे रिक्षा रस्त्याच्या कडेला मुख्य रस्त्यापासून सुमारे ३५ फुट अंतरावरील विहीरीत कोसळून प्राणांतिक स्वरुपाचा अपघात झाला. सदर अपघाताच्या प्राथमिक चौकशीत अपघाताचा रस्ता वळणाचा व उताराचा असून राज्य परिवहन बस ही रस्त्याच्या उजव्या बाजूस जाऊन रिक्षाला धडकून रिक्षासह रस्त्यालगतच्या विहीरीत पडून अपघात झाला असल्याचे व सदरच्या अपघातास राज्य परिवहन बस चालक (मृत) जबाबदार असल्याचे प्राथमिक तपासणीत निदर्शनास आले आहे. सदर अपघातग्रस्त बस ही विहीरीतून काढल्यानंतर सदर बसची तपासणी केली असता, बसचे सर्व टायर सुस्थितीत आढळुन आले. त्यामुळे सदरचा अपघात बसचा टायर फुटल्यामुळे झाला असल्याची वस्तुस्थिती नाही.

सदर बसमधून एकूण ५० प्रवाशी व कामगिरीवरील चालक/वाहक ०२ असे एकूण ५२ व्यक्ती प्रवास करीत होते. त्यापैकी १६ प्रवाशी व १ चालक असे १७ व ॲपे रिक्षामधील ८ प्रवाशी व १ चालक असे ९ असे एकूण २६ व्यक्ती मृत पावले आहेत. तसेच बसमधील ३४ प्रवाशी व १ वाहक असे एकूण ३५ व्यक्ती जखमी झालेल्या आहेत.

राज्य परिवहन बसमधील १६ मयत प्रवाशांच्या वारसांना प्रत्येकी रु.१०,०००/- याप्रमाणे आर्थिक तात्कालीक मदत देण्यात आली असून बस चालक यांचे अंत्यसंस्कारासाठी रु. ५०००/- तातडीची मदत देण्यात आली आहे त्याचप्रमाणे रा.प. बसमधील १५ मृत प्रवाशाचे वारसांना प्रत्येकी रु.१० लाख याप्रमाणे (तत्कालीक मदतीसह) नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. बसमधील एक मृत प्रवासी यांचे वारसाने न्यायालयात जाणार असल्याने मदत स्विकारलेली नाही. बसचा वाहन चालक यांचे वारसास श्रमीक नुकसान भरपाई कायद्यांतर्गत रु. ५,१३,३२०/- एवढी रक्कम अदा करण्यात आलेली असून रु. १० लक्ष मदत किंवा वारसास नोकरी यापैकी एक पर्याय निवडण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

शासनाने घोषित केल्यानुसार त्रयस्थ वाहनातील ९ मृत व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रु. २ लक्ष प्रमाणे अंतिम नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही सुरु असून, आतापर्यंत तीन व्यक्तींना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. रा.प.बसच्या अपघातात मृत झालेल्या प्रवाशाच्या वारसास अथवा त्रयस्थ वाहनातील मृत व्यक्तीच्या अवलंबितास अनुकंपा तत्वावर नोकरी तसेच त्रयस्थ वाहनातील मृत व्यक्तीच्या अवलंबितास दहा लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याबाबत रा.प.महामंडळाचे धोरण अस्तित्वात नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या बस अपघात टाळण्याच्या अनुषंगाने महामंडळाद्वारे नियुक्तीपुर्वक ४८ दिवसांचे सेवापुर्व प्रशिक्षण, उजळणी प्रशिक्षण, अपघात जास्त असलेल्या चालकांना संगणकीकृत चाचणी पथावर प्रशिक्षण इत्यादी उपाययोजनांबरोबरच वेर्स्टन इंडिया ऑटोमोबाईल असोशिएशन यांचेद्वारे प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच, ३१ समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली असून, चालकांच्या डोळ्यांची दृष्टी तपासणी करण्यात येते. त्याचबरोबर चालकांना अपघात प्रवण क्षेत्राची माहिती देण्यात येत असून, अपघात विरहीत सेवा करणाऱ्या चालकांचा रोख रक्कम देऊन गौरव करण्यात येत असून, विनाअपघात सेवा देण्याबाबत चालकांना प्रोत्साहीत करण्यात येत आहे.

*****

९८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन

लक्षवेधी सूचना,

**सर्वश्री.संजय जगताप, अमित झनक, विक्रमसिंह सावंत, हिरामण खोसकर, अमीन पटेल , वि.स.स. यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये मांडलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

"राज्यात खुल्या प्रवर्गातील महिला व इतर सर्व प्रवर्गातील विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत महिला यांना ३० टक्के आरक्षणाचा लाभ देण्याकरीता आवश्यक असलेले निकष शासन निर्णयाद्वारे विहित करताना मोठया प्रमाणात संदिग्धता निर्माण होणे, यामुळे खुल्या प्रवर्गातील महिला, विधवा, परितक्त्या, घटस्फोटित महिला उमेदवारास जाचक अटीस सामोरे जावे लागत असणे, महिला बाल कल्याण विभागाने विहित केलेल्या अटीनुसार महिलांचे विवाहीत व अविवाहीत अशी वर्गवारी केलेली असून अविवाहीत महिलांकरीता उत्पननाकाठी वडीलाचे व आईचा समावेश असलेल्या कुटूंबाचा उत्पन्नाचा निकष असणे, तर विवाहीत महिलांकरीता तिच्या उत्पन्नासहीत पतीच्या उत्पन्नाचा समावेश असणे, तसेच खुल्या प्रवर्गातील विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत महिला यांनाही त्यांचे उत्पन्न ग्राहय धरण्यात येणे, इतर प्रवर्गातील महिलांकरीता अशी वर्गवारी करण्यात आलेली नसणे, मुळात केंद्र शासनाच्या दि.१४ ऑक्टोबर, २००४ च्या स्पष्टीकरणात नॉन क्रिमिलेअरसाठीच्या निकषामध्ये उमेदवाराचे अथवा त्याच्या आईवडीलांचे वेतनद्वारे तसेच शेत जमिनीद्वारे प्राप्त होणारे उत्पन्न ग्राहय धरण्यात येऊ नये असे स्पष्ट नमूद असणे, असे असताना महिला व बालकल्याण विभागामार्फत फक्त खुल्या प्रवर्गातील महिला, विधवा, परितक्त्या, घटस्फोटित महिला यांच्याकरीता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची पडताळणी करताना उमेदवार व त्याच्या कुटूंबातील व्यक्तीचे वेतनाचे तसेच शेत जमिनीद्वारे मिळालेले उत्पन्न ग्राहय धरले जात असल्याने या निकषांमुळे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अवैध ठरविले जात असल्याने त्यांच्यावर अन्याय होत असल्यामुळे निर्माण झालेली नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन महिला व बालकल्याण विभगामार्फत खुल्या प्रवर्गातील महिला, विधवा, परितक्त्या, घटस्फोटित महिला यांनाही नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या वैध्यतेची तपासणी करताना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विहित केलेल्या निकषाप्रमाणेच तपासणी करण्याचे आदेश निर्गमित करुन यामध्ये सुसूत्रता आणण्याची गरज व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

## निवेदन

## (ॲड. यशोमती ठाकूर,मंत्री, महिला व बाल विकास)

महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दि.२५.०५.२००१ अन्वये, शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्थामधील सेवांमध्ये भरतीसाठी महिला करीता ३० % जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.त्यानुसार शासन निर्णय दि.२५.०५.२००१ मधील तरतुदी नुसार, खुल्या प्रवर्गातील ज्या व्यक्तीचे / कुंटुबाचे सर्व मार्गाने येणारे वार्षिक उत्पन्न सलगच्या मागील ३ वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु दोन लाख (सद्यस्थितीत आठ लाख) किंवा त्यापेक्षा अधिक असेल ती व्यक्ती / कुटुबं उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गट म्हणुन समजण्यात येईल. तसेच त्या संदर्भातील कुटुंबाच्या व्याख्येमध्ये विवाहीत महिलेच्या बाबतीत पती, पत्नी व मुले यांचा समावेश राहिल आणि अविवाहीत मुलीच्या संदर्भात आई वडील व अविवाहित भावंडे यांचा समावेश राहिल असे नमूद करण्यात आले होते.त्याप्रमाणे महिला

इ-टेटा- मंचे ७९८० (७५०-३-२०२०)    कु भा. प.

आरक्षणातुन निवड झालेल्या महिला उमेदवारांच्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची पडताळणी आयुक्त,महिला व बाल विकास, पुणे यांच्याकडून करण्यात येत असे.

तदनंतर महिला व बाल विकास विभागाच्या दिनांक २५.०५.२००१ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यासाठी आयुक्तालयास स्तरावर एक समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समिती मध्ये यशदा मधील मोफत सल्ला केंद्र यांचा समावेश करण्यात आला.

सदर समितीने सुचविलेल्या शिफारशी तसेच महिलांच्या ३० % संमातर आरक्षणासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश लक्षात घेता,महिला आरक्षणाच्या अनुषंगाने सुधारीत शासन निर्णय दिनांक १५.१२.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

सुधारित शासन निर्णयानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन परिपत्रक दि.२५.०३.२०१३ अन्वये,मागास प्रवर्गासाठी जे निकष व कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे,त्यानुसारच महिला आरक्षणातून अर्ज करणा-या महिलांच्या नॉन क्रिमीलेअरच्या प्रमाणपत्राबाबत सक्षम प्राधिकारी म्हणून संबधित तहसीलदार व नायब तहसीलदार यांनी तसेच प्रमाणपत्रांच्या पडताळणीबाबत आयुक्त, महिला व बाल विकास पुणे, यांनी कार्यवाही करावी असे नमूद करण्यात आले आहे.तर शासन निर्णय दि.११.०१.२०१९ अन्वये, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र संदर्भात महिलेची वैवाहिक स्थिती विचारात घेणेबाबतची तरतूद वगळण्यात आली आहे.तसेच एखादया विधवा /घटस्फोटीत/परितक्त्या महिलेची निवड महिला आरक्षणांतर्गत झालेली असल्यास अशा प्रकरणी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र देताना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.२५.०३.२०१३ च्या परिपत्रकामध्ये नमूद तरतुदीनुसार नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी तरतूद करण्यात आली आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता, महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दि.११.०१.२०१९ अन्वये एखादी सर्वसाधारण महिला किंवा विधवा /घटस्फोटीत/परितक्त्या महिलेची निवड महिला आरक्षणांतर्गत झालेली असल्यास अशा प्रकरणी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र देताना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.२५.०३.२०१३ च्या शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार सद्यस्थितीत महिला आरक्षणातून अर्ज करणाऱ्या महिलेची वैवाहिक स्थिती नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र देताना किंवा त्याची पडताळणी करताना विचारात न घेता, फक्त महिला उमेदवाराच्या आई वडिलांचे उत्पन्न ग्राह्य धरण्यात येते.त्यामुळे प्रस्तुत लक्षवेधी मध्ये उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांची पूर्तता या विभागाच्या शासन निर्णय दि.१५.१२.२०१७ व ११.०१.२०१९ अन्वये करण्यात आलेली आहे.

******

मच-१४५०-१०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन

लक्षवेधी सूचना.

**ॲड.अशिष शेलार, ॲड.पराग अळवणी, सर्वश्री.प्रशांत ठाकुर,संजय केळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री किसन कथोरे, अमित साटम, कॅप्टन आर.तमिल सेल्वन, सर्वश्री.देवेंद्र फडवणीस, चंद्रकांत पाटील, अबू आजमी,रईस शेख, वि.स.स. यांनी मांडलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

"निर्भया घटने नंतर अत्याचार, पिडीत महिला व मुलींना एकाच छताखाली समुपदेशन, कायदेविषयक मदत, निवारा, वैद्यकीय मदत मिळावी यासाठी केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रालयाद्वारे संपूर्ण देशात "वन स्टॉप सेंटर" ही योजना सुरु करण्यात येणे, या योजने अंतर्गत राज्यातील अनेक जिल्ह्यातही योजना सुरु करण्यात आलेली असणे, महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण असलेल्या या योजनेचा अभ्यास राज्य महिला आयोगामार्फत करण्यात आलेला असणे, राज्यातील अहमदनगर, अकोला, अलिबाग, अमरावती, औरंगाबाद, नागपुर, नांदेड, नाशिक, सातारा जिल्ह्यातील प्रत्येकी एक आणि पुणे येथील २ अशा एकूण ११ केंद्रांचा अभ्यास महिला आयोगामार्फत करण्यात येणे, या अभ्यासात सदर "वन स्टॉप सेंटर" संदर्भात अनेक त्रुटी आढळून येणे, यात प्रामुख्याने सेंटरची इमारत मार्गदर्शन सूचनांनुसार नसून कोणतेही सेंटर २४ तास सुरु नसणे, ११ पैकी २ सेंटर हे एनजीओच्या माध्यमातून सुरु असणे, सेंटर मधील कर्मचा-यांना आवश्यक प्रशिक्षण दिलेले नसल्यामुळे त्यांना प्रशिक्षणाची गरज असणे, याबाबत अमलबजावणी करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांकडे महिला आयोगाने अहवालाद्वारे केलेल्या शिफारसी त्यामुळे अत्याचार पिडीत महिलांसाठी अत्यंत महत्वाचे "वन स्टॉप सेंटर" अद्यायावत करणे व महिला आयोगाच्या शिफारसींची तातडीने दखल घेऊन सदर सेंटर २४ तास सुरु ठेवण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया"

## निवेदन

## (ॲड. यशोमती ठाकूर,मंत्री, महिला व बाल विकास)

"निर्भया" घटने नंतर अत्याचार, पिडीत महिला व मुलींना एकाच छताखाली समुपदेशन, कायदेविषयक मदत, निवारा, वैद्यकीय मदत मिळावी यासाठी केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रालयाद्वारे संपूर्ण देशात "वन स्टॉप सेंटर" योजना सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेंअंतर्गत "वन स्टॉप सेंटर" या ठिकाणी महिलेस वैद्यकीय उपचार, समुपदेशन, पोलीस सहाय, मानसोपचार, विधी सहाय्य, अल्प कालावधीसाठी निवारा व अन्न इ. सुविधा पुरविण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्हयांसाठी प्रत्येकी एक आणि पुणे जिल्ह्यासाठी २ अशी एकुण ३७ केंद्रे राज्यात सुरु करण्यात आलेली आहेत. केंद्र पुरस्कृत वन स्टॉप सेंटर या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्यातील सर्व ३६ जिल्हयांमध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच या केंद्रांचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी एक ईम्प्लीमेंटींग एजन्सी नेमावयाची असते. त्यानुसार राज्यातील १८ जिल्हयांमध्ये ईम्प्लीमेंटींग एजन्सींची नियुक्ती केलेली असुन उर्वरीत जिल्हयांमध्ये ईम्प्लीमेंटीग एजन्सी नियुक्तीबाबतची कार्यवाही सुरु आहे. वन स्टॉप सेंटरच्या इमारतीच्या कायमस्वरुपी बांधकामासाठी १३ जिल्हयांमध्ये शासकीय जमीन उपलब्ध झाली असुन उर्वरीत जिल्हयांमध्ये शासकीय जमीन उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालयांकडुन सुरु आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सदर योजनेस केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयामार्फत १०० टक्के अनुदान वितरीत करण्यात येत असुन संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, व्यवस्थापन समिती वन स्टॉप सेंटर यांच्या बँक खात्यावर सदरचे अनुदान जमा होत आहे. या योजनेकरिता राज्य

शासनाकडुन कोणत्याही प्रकारचे अनुदान दिले जात नाही. सदर योजनेसाठी केंद्रशासनाकडुन १०० टक्के अनुदान थेट जिल्हाधिकारी यांच्या वन स्टॉप सेंटर या बँक खात्यावर उपलब्ध होत आहे. त्यानुसार माहे जानेवारी २०२० अखेर राज्यातील १४ जिल्हयांमधील १५ केंद्रांसाठी (ठाणे,रायगड,पुणे-१,पुणे-२,सातारा, नाशिक, अहमदनगर, नांदेड, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ,नागपूर चंद्रपूर व गडचिरोली) बांधकामासाठी एकुण रु.५,७२,७७,३३३/- (पाच कोटी बहात्तर लाख सत्याहत्तर हजार तीनशे तेहतीस फक्त) इतके अनुदान उपलब्ध झाले आहे. तसेच ३६ जिल्हयांसाठी आवर्ती व अनावर्ती अनुदान एकुण रु.९,९२,२०,९९८/- (नऊ कोटी ब्याण्णव लाख वीस हजार नऊशे अठ्ठयाण्णव फक्त) उपलब्ध झाले आहे.

राज्यातील ३६ जिल्हयांसाठी ३७ केंद्रे मंजुर करण्यात आली आहे. वन स्टॉप सेंटरसाठीच्या कायमस्वरुपी इमारतीच्या बांधकामासाठी १३ जिल्ह्यांमध्ये शासकिय जमीन उपलब्ध झाली असुन त्या जागेवर बांधकाम करण्याची प्रक्रीया सुरु आहे. सदरचे बांधकाम पुर्ण होईपर्यंत जिल्ह्यांतील शासकिय रुग्णालांमध्ये उपलब्ध असलेल्या इमारतींमध्ये किंवा इतर उपलब्ध इमारतींमध्ये सदरचे केंद्र तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत करण्यात आलेले आहेत. उर्वरीत जिल्हयांमध्ये शासकीय जमीन उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्य महिला आयोगाने सादर केलेल्या अहवालामध्ये वन स्टॉप सेंटर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे शिफारशी केल्या आहेत. १) आर्थिक बाबी संबंधी, २) इंप्लीमेंट एजन्सीची नियुक्ती, ३) पायाभूत सोयीसुविधाबाबत, ४) गुणवत्ता निकषात वृध्दी करणे - अ) वन स्टॉप सेंटर कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण, ब) संनियंत्रण यंत्रणा, क) १८१ हेल्पलाईनचे बळकटीकरण करणे.

वन स्टॉप सेंटर ही केंद्र पुरस्कृत योजना असुन योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हे संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे आहेत. त्यानुसार आयुक्तालय स्तरावरुन दि.२०.११.२०१९ च्या पत्राअन्वये जिल्हाधिकारी (सर्व) यांना वन स्टॉप सेंटर योजनेचा जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणेबाबत कळविलेले आहे. तसेच राज्य महिला आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने वन स्टॉप सेंटर या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी त्वरीत कार्यवाही करणेबाबत आयुक्तालय स्तरावरुन दि.३०.१.२०२० अन्वये जिल्हा महिला व बालविकास अधिकारी (सर्व) यांना कळविण्यात आले आहे. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, व्यवस्थापन समिती (सर्व) यांना आयुक्तालय स्तरावरुन दि.२५/११/२०१९ अन्वये ज्या जिल्हयांमध्ये अद्यापही ईम्प्लीमेंटींग एजन्सी नियुक्त झालेली नाही अशा जिल्हयांनी त्वरीत ईम्प्लीमेंटींग एजन्सी नियुक्त करणेबाबत कळविले आहे.

संकटग्रस्त महिलांच्या मदतीसाठी केंद्र शासनाने मुख्यमंत्री १८१ टोल फ्री क्रमांक असलेली हेल्पलाईन राज्यात सुरु करण्याबाबतची योजना आहे. सदर योजनेसाठीचे अनुदान केंद्र शासनाकडुन उपलब्ध होईपर्यंत सदर योजना महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सहाय्याने मुख्यमंत्री १८१ महिलांसाठी टोलफ्री दुरध्वनी मुंबई येथे कार्यान्वीत केले आहे. सदर टोलफ्री क्रमांक अधिक प्रभावीपणे कार्यान्वीत करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाचा निधी उपलब्ध करुन घेऊन केंद्र शासनाने निश्चीत करुन दिलेल्या निकषांनुसार पुणे येथे स्वतंत्र हेल्पलाईन सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

*******

## महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२० चे दुसरे (अर्थसंकल्पीय ) अधिवेशन

**सर्वश्री अतुल भातखळकर, राधाकृष्ण विखे पाटील, सुनील प्रभु, सदा सरवणकर, अमिन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, सुरेश वरपुडकर, विक्रमसिंह सावंत, चंद्रकांत जाधव, ऋतुराज पाटील, संजय जगताप, विकास ठाकरे, अमित झनक, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हबर्डे, बळवंत वानखडे, राजू पारवे, राजु आवळे, हीरामण खोसकर, योगेश सागर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-**

"देशाची आर्थिक राजधानी म्हणून लौकिक असणारी मुंबई प्रदूषणाच्या विळख्यात अडकत असणे, सागरी परिक्षेत्र लाभलेल्या देशातील इतर शहरांपेक्षा मुंबईत वायू प्रदूषणाची समस्या गंभीर असणे, बिझनेस हब म्हणून ओळखले जाणारे बांद्रा, कुर्ला संकुल (बीकेसी) सर्वाधिक प्रदूषित विभाग असणे, बोरीवली, मालाड , अंधेरी, वरळी, माझगाव, नवी मुंबई या सारख्या ठिकाणी हवेचा दर्जा घसरलेला असणे, डिसेंबरच्या अखेरच्या आठवडयात सूक्ष्म प्रदूषक धूलीकणांचे हवेमधील प्रमाण जास्त आढळणे, प्रदूषणासाठी कारणीभूत असणाऱ्या व्यवसायांवर कोणतीही कारवाई न होणे, वायू प्रदूषणासोबतच जल प्रदूषण ही मोठ्या प्रमाणात होत असल्याने नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणे, मुंबई हवा प्रदूषण नियंत्रण आराखडयात तीन वेळा दुरुस्ती करुनही अनेक त्रुटी असणे, अनेक स्वयंसेवी संस्था पुढाकार घेत नागरिकांमध्ये जनजागृतीचे कार्य करीत असणे, परिणामी नागरिकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने यावर करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

## मंत्री (पर्यावरण ) यांचे निवेदन

मुंबई शहराची ओळख औद्योगीक शहर म्हणून फार पूर्वी करण्यात येत होती. स्वातंत्र्योत्तर काळात वाढते शहरीकरणामुळे मुंबईतील बहुतांशी उद्योग नजीकच्या ठाणे व रायगड जिल्हयात स्थलांतरीत झाले आहेत. मुंबई शहर विकास प्राधिकरण यांचे १९९१ चे धोरणानुसार मुंबई शहर व सभोवतालचा परिसर प्रदूषणकारी उद्योगांच्या उभारणीस बंदी घालण्यात आली होती. मुंबईतील जागेच्या वाढत्या किंमती व औद्योगिक प्रक्रियेतील रसायनांचा वापर इ. बाबींमुळे बहुतांशी उद्योगजकांनी त्यांचे उद्योग मुंबई परिसरात बंद करुन पर्याप्त जागी स्थलांतरीत केले आहेत. सद्य:स्थितीत मुंबई शहरामध्ये मुख्यत्वे करुन अभियांत्रिकी, प्लॅस्टिक, इ. प्रकारचे विनाप्रदुषणकारी लघुउद्योग औद्योगिक वसाहती मध्ये कार्यरत आहेत.

मुंबई परिसरात मे. एच.पी.सी.एल, मे.बी.पी.सी.एल, मे. टाटा पावर, मे. आर.सि.एफ, मे. महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा इ. मोठे उद्योग कार्यरत असून, उपरोक्त उद्योगांव्यतिरिक्त मुंबई परिसरात इंजिनियरींग, प्लास्टिक, इलेक्टॉनिक्स व तत्सम उत्पादन करणा-या लघु तथा कुटीर उद्योग औद्योगिक वसाहतीतून कार्यरत असलेले आढळतात. संबंधीत उद्योगात प्रदूषण नियंत्रणासाठी अद्यावत यंत्रणा कार्यान्वित आहे.

जागेच्या कमतरतेमुळे मुंबई व सभोवतालच्या परिसरात गगनचुंबी इमारती उभ्या राहिल्या असून वाहनांची वाढती संख्या, त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी, पायाभूत बांधकाम प्रकल्प इत्यादी मुळे परिसरातील वातावरणातील हवेची गुणवत्ता दिवसें-दिवस खालावत असल्याचे आढळते.

मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येला पर्यायी व्यवस्था उपलब्ध करण्यासाठी १९७२ साली नवी मुंबई शहराची निर्मिती करण्यात आली असून या शहराचा विकास मुख्यत: सिडको (शहर व औद्योगिक विकास प्राधिकरण) कडुन करण्यात आलेला आहे. नवी मुंबई शहराचे एकुण क्षेत्रफळ ३४३.७ चौ किमी असून सिडकोने एकुण १४ नोडस विकसित केलेले आहेत. ठाणे बेलापूर मार्गावर उत्तरेकडील बाजुस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने १९७२ साली टिटिसी औद्योगिक वसाहत विकसित केली आहे.

टिटिसी औद्योगिक वसाहतीमध्ये मुख्यत्वे रासायनिक, अभियांत्रिकी, औषध निर्मिती, कापड प्रक्रिया तसेच माहिती व तंत्रज्ञान उद्योग कार्यरत आहेत तसेच नवी मुंबई शहराच्या परिसरात दगड खाण उद्योग देखील वसलेले आहेत. तसेच ठाणे -बेलापूर औद्योगिक वसाहती मध्ये जल प्रदुषण करणाऱ्या उद्योगामधून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर उद्योगांमार्फत प्रक्रिया

केली जाते. तसेच प्रकिया केलेले सांडपाणी पुन:प्रक्रिया करण्यासाठी प्राथमिक व द्वितीयक प्रक्रिया सयंत्रणा असलेले २७ दलघमी क्षमतेचे सामुहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेमध्ये (सीईटीपी) पाठविण्यात येते व प्रक्रियाकृत सांडपाणी ७ किमी लांबीच्या बंद पाईपलाईनद्वारे वाशी येथील खाडीमध्ये सोडले जाते. तसेच, संबंधीत उद्योगात प्रदूषण नियंत्रणासाठी अद्यायावत यंत्रणा कार्यान्वित आहे.

मुंबई शहरापासुन महाराष्ट्राच्या अन्य भागात होणारी वाहतुक मुख्यत्वे नवी मुंबई मार्गे होते. तसेच नवी मुंबई जवळ असलेल्या जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, व इतर प्रकल्पामुळे रस्ते वाहतुक मोठया प्रमाणात होते.

मुंबई व नवी मुंबई येथील वायु सर्वेक्षण केंद्रांवरील माहे डिसेंबर २०१९ व जानेवारी २०२० चा वायु सर्वेक्षणाच्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा अहवालाची केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकाबरोबर तुलना केली असता सर्वसाधारणपणे धुलीकणंची पातळी काही प्रमाणात अधिक असल्याचे दिसून येते.

सर्वसाधारणपणे हवेतील प्रदूषकांची पातळी पावसाळ्यात सर्वात कमी व हिवाळ्यात सर्वाधिक असते. पावसाळ्यात पावसाच्या पाण्याबरोबर मिसळल्याने व समुद्रावरुन येणाऱ्या वेगवान नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे हवेतील प्रदूषणाचा निचरा होतो. हिवाळ्यात हवेच्या कमी तापमानामुळे व वेगवान वाऱ्याच्या अभावाने जमिनीलगतची प्रदूषके ही उंचीवरील हवेत मिसळण्याचे प्रमाण कमी होते. त्यामुळे सततच्या तयार होणाऱ्या प्रदूषकांचा निचरा न झाल्याने हवेतील त्याचे प्रमाण वाढत जाते. मुंबईमध्ये उत्तर व ईशान्य भागात अधिक उद्योगधंदे आहेत. हिवाळ्यात वाऱ्याची दिशा उत्तर व ईशान्येकडून असल्याने मुंबईत हिवाळ्यात प्रदूषणाचे प्रमाण काही प्रमाणात अधिक आढळते.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ सन २०११ ते २०१५ या कालावधीतील भारतामधील २२ राज्यातील ९४ शहरांमधील हवेची गुणवत्ता प्रदूषित झाली असल्याचे प्रसिध्द केले होते. त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील मुंबई, नवी मुंबई, उल्हासनगर, बदलापूर, पूणे, नागपूर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, चंद्रपूर, जळगाव, जालना, सांगली, कोल्हापूर, लातूर, नाशिक, सोलापूर व ठाणे या १८ शहरांचा समावेश करण्यात आला होता. या शहरांमध्ये धुलीकण (पीएम -१०), या घटकाची मात्रा मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले होते.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदूषित शहरांचे प्रदूषण रोखण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत हवा (प्रतिबंध व नियंत्रण ) कायदा १९८१, कलम क्रमांक १८ (१) (ब) अन्वये निर्देश दिले होते. त्यामध्ये शहरातील वाहनांमुळे होणारे हवा प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी कृती आराखडा, शहरातील रस्त्यावरील वर्दळीमुळे निर्माण होणारे धुलीकण नियंत्रणात आणण्यासाठीचा कृती आरखडा, हवेतील धुलीकणाचे प्रमाण कमी करण्यासाठी, पालापाचोळा/घरगुती घनकचरा जाळल्यामुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठीचा कृती आरखडा , उद्योगांमुळे होणारे हवा प्रदूषण रोखण्याचा कृती आराखडा, बांधकामाच्या घडामोडीमुळे निर्माण होणारे हवा प्रदूषण नियंत्रणात करण्यासाठीचा कृती आराखडा , शहरातील हवेतील धुलीकणाचे प्रमाण कमी करण्यासाठीचा कृती आराखडा इत्यादी आराखडे तयार करण्याच्या निर्देशांचा समावेश होतो.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेशाची अंमलबजावणी करीत असताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुंबई व नवी मुंबई शहरातील संबंधीत महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA), वाहतुक विभाग, इत्यादीं भागधारकांसोबेत मुंबई शहराचा सर्वसमावेशक कृती आराखडा तयार करुन, राज्यस्तरीय हवा गुणवत्ता संनियंत्रण समितीच्या मान्यतेने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर केला होता. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शनानुसार व वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांनुसार अनुक्रमे दि. २८/०२/२०१९, २४/०४/२०१९ व २७/०९/२०१९ सुधारीत आराखडे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर करण्यात आले होते. त्या अनुषंगाने, मुंबई शहराच्या अंतिम कृती आराखडयास केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ०९/१०/२०१९ रोजी मान्यता दिली आहे. सदर कृती आराखडयाच्या अंमलबजावणीचे आदेश संबंधीत महानगरपालिकेस अंमलबजावणीकरिता पाठविण्यात आले आहेत.

कृती आराखडयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी महानगरपालिका/नगरपालिका यांच्यासोबत आढावा बैठक घेण्यात येत आहेत. तसेच राज्यामध्ये मा. मुख्य सचिव,

महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती, प्रधान सचिव, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय हवा गुणवत्ता संनियंत्रण समिती आणि जिल्हाधिकारी/आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नागरी समिती, अशा त्रिस्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या समित्यांनमार्फत कृती आराखडा अंमलबजावणी संबंधीचा नियमितपणे घेण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुंबईसह १८ शहरांमधील हवा प्रदूषणाचे प्रमुख स्तोत्र ओळखून त्यांचे मोजमाप करुन, तांत्रिक आराखडा तयार करण्याचे काम नामांकित अशा राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (निरी) व भारतीय प्रौद्योगिक अभियांत्रिकी संस्था,पवई (आय.आय.टी.) यांच्यासोबत करारनामा करुन, यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने लघु कालावधीसाठीचा अहवाल प्राप्त झाला आहे.

मुंबई शहरामध्ये स्वयंचलीत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी संयंत्रणेची (CAAQMS) ११ ठिकाणी यंत्रणा उभी केली आहे. या संनियंत्रण केंद्रांद्वारे तपासणी केलेल्या हवेच्या गुणवत्तेबाबतची माहिती केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास ऑनलाईन कळविण्यात येते.

बांद्रा कुर्ला संकुलामध्ये होत असलेल्या विविध विकास कामामुळे/ नागरी समस्या यामुळे होणाऱ्या प्रदुषणाच्या अनुषंगाने महानगर आयुक्त, मुंबई यांनी दि. २६.१२.२०१९ रोजी संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखासोबत बैठक आयोजित केली होती व त्यामध्ये विषयांकीत मुद्दयावर चर्चा करून उपरोक्त बाबीवर आळा घालण्याकामी दंड आकारण्याची तरतुद करण्यात आली आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडुन सन २०१८ मध्ये केलेल्या पाहणी नुसार प्रदूषित शहरांच्या यादीत नवी मुंबई शहराचा ५१ वा क्रमांक येतो व या शहराचा सीईपीआय (सर्वसमावेशक पर्यावरण प्रदूषण अनुक्रमणिका) स्कोर ६६.३२ इतका आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडुन वायु गुणवत्तेमध्ये सुधारणा होण्याकरिता इंधन म्हणून कोळसा वापरणाऱ्या उद्योगांना नैसर्गिक वायू इंधन म्हणुन वापरण्याचे निर्देश देणे, प्रदूषणकारी खडी मशीन उद्योगांचे सर्वेक्षण करुन त्यांच्यावर कारवाई करणे, वाहतुकीच्या रस्त्यांची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत निर्देश देणे, नवी मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना हरीत पट्टा क्षेत्रात वाढ करण्याचे निर्देश देणे, सार्वजानिक बांधकाम विभागाला शहरांतर्गत येणारे राष्ट्रीय व राज्य महामार्ग यांची दुरुस्ती व देखभाल वेळोवेळी करुन वाहतुकी दरम्यान होणारे धुलीकणांच्या प्रदुषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी योग्य त्या सूचना देणे इत्यादी उपाय करण्यात आले आहेत.

***************************************************